म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. क्र. ९३९३

# वि
# मंथ

REFBK-0010879
REFBK-0010879

प्रकाशन
पुणे

# विचार-मंथन

( निबंध संग्रह )

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम २८२६ वि: निबंध
क्रमांक ...... नों: दि: २०/१२/६१

: लेखक :

शांतीलाल सी. शहा, बी. कॉम्.

म. ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. १०८५९
ग्रंथ शाखा स्थळ प्रत

REFBK-0010879

सह्याद्रि प्रकाशन
पुणे

मूल्य : दीड रुपया

प्रकाशक :
गो. शं. सोनसळे,
सह्याद्रि प्रकाशन,
१२० नारायण पेठ, पुणें २.

आवृत्ति पहिली : १९६०

मुद्रक :
र. शं. गांगण
श्री अक्षर मुद्रणालय,
४३८ अ सदाशिव, पुणें २.

परमपूज्य माता

**वसंताबाई छोटालाल शहा**

यांच्या पवित्र स्मृतीस—

# प्रास्ताविक

‘ पाश्चिमात्य शिक्षण हें वाघिणीचें दूध आहे, ’ असें कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनीं म्हटलेलें होतें. पाश्चिमात्य शिक्षणामुळें भारतांत एक प्रकारचें चिकित्साप्रधान युग निर्माण झालें. प्रत्येक प्रश्न, प्रत्येक समस्या यांची कसोटी बुद्धीवर घांसली जाऊं लागली. त्यामुळें जुन्या विचारांना व श्रद्धांना एक प्रकारचा धरणीकंप झाला. जुन्या विचारांची पडझड होऊं लागली. परंतु त्या विचारांची आणि श्रद्धांची जागा अद्यापपावेतों नव्या विचारांनीं व आचारांनीं घेतलेली नाहीं. त्यामुळें कांहीं वेळां आपल्या मनांत प्रचंड पोकळी निर्माण होते. जुन्या श्रद्धांवर विश्वास नाहीं, त्यांची जागा नव्या श्रद्धांनीं घेतलेली नसल्यानें आपली मनःस्थिति हल्लीं अस्थिर व चंचल आहे, व अशा प्रकारच्या पोकळींत आपली आजची पिढी सांपडलेली आहे. विचार व आचारांच्या दृष्टीनें आपला आजचा काल संक्रमण अवस्थेचा आहे, आणि समाज व धर्म परिवर्तनशील असल्यानें, जुन्या विचारांना डागडुजी करणें अपरिहार्यच ठरेल. म्हणूनच आपल्या कांहीं सामाजिक व धार्मिक प्रश्नांच्या विचारांचें मंथन करण्याचा प्रयत्न पुढील पृष्ठांतून केलेला आहे.

या पुस्तकांत मी कांहीं धार्मिक व सामाजिक विषयांवर चर्चा केलेली आहे. ‘ धर्म व क्रिया ’ व ‘ धर्म आणि विज्ञान ’ हा प्रचलित समाजांतील माझ्या मतें अत्यंत महत्त्वाचा प्रश्न आहे. रूढीच्या चाकोरींतून चालणाऱ्या व्यक्तींना नेहमीं वाटतें, ‘ धर्म बुडाला, धर्म बुडाला ’ परंतु खरी वस्तुस्थिति काय आहे याचें विवेचन ह्या निबंधांत केलेलें आहे. त्याचप्रमाणें ‘ धार्मिक शिक्षणाची आवश्यकता ’ या विषयाचेंहि आहे. आज सर्वसामान्य माणसापासून तों कांहीं शिक्षण-शास्त्रज्ञांपर्यंत सर्वांना असें वाटतें कीं ‘ धार्मिक शिक्षण ’ शाळा-कॉलेजांतून सक्तीचें असणें आवश्यक आहे.

गेल्या वर्षांतील सुशिक्षित गुन्हेगारी दृष्टोत्पत्तीस आल्यानंतर सर्वसामान्य माणसाचें मन उद्विग्न होणें अपरिहार्य आहे. समाजांतील ह्या

व्यक्तींच्या हातून देशसेवेची व समाजसेवेची आपण अपेक्षा करतों, अशांनीं समाजसेवा किंवा देशसेवा करण्याऐवजीं धनाच्या लोभास बळी पडून दरोडेखोरांसही लाजवील असे फौजदारी स्वरूपाचे गुन्हे केलेले पाहिले म्हणजे मनाला सखेदाश्चर्य वाटतें. अशा प्रकारची सुशिक्षित गुन्हेगारी पाहून मनाला काय वाटतें याचें विवेचन त्या लेखांत केलेलें आहे.

आजच्या आपल्या सामाजिक जीवनांतील महत्त्वाचा व ज्वलंत प्रश्न म्हणजे सुशिक्षित मुलींच्या विवाहाचा ! ह्या प्रश्नानें थोडेंसें उग्र स्वरूप धारण केलेलें आहे, असें म्हटल्यासहि अतिशयोक्ति होणार नाहीं. म्हणून या प्रश्नाचें विवेचनहि केलेलें आहे.

हे निबंध लिहितांना माझी भूमिका ही अगदीं एखाद्या विद्यार्थ्यासारखी आहे. कारण या सर्व विषयांचा माझा अभ्यास अपूर्ण आहे. याची मला संपूर्ण जाणीवच नव्हे तर खात्री आहे—म्हणून या सर्व विवेचनांत अपूर्णता राहण्याचा संभव आहे. परंतु या विषयांवर गेलीं कांहीं वर्षें मीं जें कांहीं थोडेंफार चिंतन केलें आहे तें समाजापुढें यावें व त्या विषयावर साधकबाधक चर्चा व्हावी, आणि त्याचा विचारपूर्वक निर्णय घ्यावा एवढाच हे निबंध लिहिण्याचा हेतु आहे. सारांश, अशा सर्व विचारप्रवाहांचें मंथन, व्हावें व असें मंथन झाल्यावर त्यांतून दहीं निर्माण व्हावें एवढाच हेतु हें पुस्तक प्रसिद्ध करण्यांत आहे. आणि म्हणूनच या पुस्तकास 'विचार-मंथन' हें नांव दिलेलें आहे.

पुस्तकांत कांहीं ठिकाणीं द्विरुक्ति असण्याचा संभव आहे. त्याचें एकमेव कारण असें कीं हे निबंध वेगवेगळ्या वेळीं विविध वृत्तपत्रांतून प्रसिद्ध होण्याच्या दृष्टीनें लिहिले गेले व त्यांतील कांहीं निबंध 'विशाल सह्याद्री', 'सन्मति' इत्यादि वृत्तपत्रांतून प्रसिद्ध झालेले आहेत. त्यामुळें कांहीं प्रसंगीं द्विरुक्ति झालेली आहे.

हें पुस्तक प्रसिद्ध करण्याचे कामीं, माझे मित्र व 'सह्याद्रि प्रकाशन' चे मालक व चालक श्री. सोनसळे यांनीं अत्यंत तत्परतेनें सहकार्य केल्याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारीच नव्हे तर ऋणी आहें. त्यांनीं जर मला इतकें

हार्दिक व प्रेमळ सहकार्य दिलें नसतें, तर कदाचित् हें पुस्तकहि प्रसिद्ध झालें नसतें. म्हणून मी श्री. सोनसळे यांचा अत्यंत आभारी आहें.

त्याचप्रमाणें माझे इतर परम मित्र श्री. शां. पा. शहा, भानुसाळी, ललवाणी, परमार व श्री. मुनोत इत्यादि मित्रांनींहि वेळोवेळीं प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष जें हार्दिक सहकार्य दिलें व आस्था दर्शविली, त्याबद्दलहि मी त्यांचा आभारी आहें.

वाचकवर्ग या विचारप्रवाहांचें मंथन करून नवसमाजनिर्मितीचें कार्य पूर्ण पाडण्याचा प्रयत्न करतील अशी आशा बाळगून मी या पुस्तकाची प्रस्तावना संपवितों.

१२४ रविवार पेठ, पुणें २.
दिनांक १५।१२।६०.

—शांतीलाल सी. शहा,
बी. कॉम्.

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. श्रद्धेचें जीवनांत स्थान | ... | १ |
| २. धर्म व क्रिया | ... | ५ |
| ३. धार्मिक शिक्षणाची आवश्यकता | ... | १३ |
| ४. सुशिक्षित मुलींच्या विवाहाचा प्रश्न | ... | १७ |
| ५. अशी आहे ही अमेरिका | ... | २१ |
| ६. आमचें आजचें जीवन आणि चारित्र्य | ... | ३९ |
| ७. धर्म आणि विज्ञान | ... | ४५ |
| ८. मध्यमवर्गीयांचा प्रश्न | ... | ५२ |
| ९. लोकप्रिय कसें व्हावें ? | ... | ५९ |

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ........ वि: ........
क्रमांक ........ नों: दि: ........
ठा. क्र.

# श्रद्धेचें जीवनांत स्थान : १

विविध प्रकारच्या यांत्रिक आणि वैज्ञानिक सुधारणेमुळें मानवजात कळत किंवा अकळत, अत्यंत शीघ्र वेगानें निव्वळ भौतिक सुखाचेच मार्गे धांवत आहे. आणि निव्वळ भौतिक सुखाच्या आहारीं गेलेल्या आजच्या या मानवाला, श्रद्धेचा जीवनांत कांहीं उपयोग आहे कीं नाहीं याचा विचार करावयासहि फुरसत नाहीं. परंतु याच मानवाच्या आयुष्यांत कांहीं प्रसंग असे येतात कीं, ज्यामुळें त्याला श्रद्धेचें महत्त्व चटकन् पटतें. म्हणून श्रद्धेचें महत्त्व काय याचा विचार करण्याचें या लेखांत योजलेलें आहे.

श्रद्धा म्हणजे काय? साहाजिकपणेंच पहिला प्रश्न असा उभा रहातो कीं, श्रद्धा म्हणजे काय? श्रद्धेची व्याख्या करणें फारच कठीण आहे. परंतु मर्यादित स्वरुपांत श्रद्धेची व्याख्या मी अशी करीन कीं, चांगल्या नीतिमत्तेच्या तत्त्वांवर संपूर्ण विश्वास असणें म्हणजे श्रद्धा असणें असें आपणांस सर्वसाधारणरीत्या म्हणतां येईल. म्हणजे सत्य, सदाचरण वगैरे हीं व इतर दुसरीं जीं कांहीं चांगलीं नीतितत्त्वें आहेत त्या तत्त्वांवर विश्वास असणें म्हणजे श्रद्धा असणें असें सर्वसाधारणपणें म्हणतां येईल. निदान हा लेख लिहितांना ही व्याख्या समोर ठेवून हा लेख लिहिलेला आहे.

कदाचित् असा प्रश्न उद्भवेल कीं बुद्धिवादाच्या काळांत श्रद्धेचा फायदा काय, असा प्रतिगामी स्वरुपाचा प्रश्न कां उभा केला जात आहे? बुद्धीनें सर्व क्षेत्रांत विलक्षण आघाडी मारली आहे. विज्ञान, शिक्षण, इतिहास, अर्थशास्त्र अशा सर्व क्षेत्रांतील सर्व दालनांत, ह्या बुद्धीनें सर्वांगीण प्रगति करून दाखविलेली आहे व विसाव्या शतकांतील मानवाला सर्वत्र सुखाची फुलबागच निर्माण करून दिलेली आहे. विजेचें बटन दाबलें कीं सूर्यप्रकाशापेक्षां श्रेष्ठ असा प्रकाश, स्वतःच्या दिल्ली येथील प्रासादतुल्य

बंगल्यांत बसून लंडनच्या माणसाशीं बोलण्याची सोय, वायूवेगानें धांवून सबंध जगाचें अंतर कापणारीं विमानें अशा कितीतरी प्रभावी आणि यशस्वी गोष्टी बुद्धीच्या सामर्थ्यानें मानवाला उपलब्ध करून दिलेल्या आहेत. असें असून असा प्रश्न कां उपस्थित व्हावा ? त्याचें कारण माझे मतें कदाचित् एक असूं शकेल. तें असें कीं, ज्याप्रमाणें ह्या विज्ञानानें सुखाचीं नवीन नवीन दालनें निर्माण केलीं, त्याचप्रमाणें नवीं नवीं दुःखेंहि व कठीण अशा समस्या राजकीय, सामाजिक, आर्थिक व इतर क्षेत्रांतहि निर्माण केल्या. यंत्रें निर्माण झाल्याचें जसें सुख दिसतें तसें त्याचें दुःखहि मानवाला भोगावें लागत आहे. त्यामुळें बुद्धीनें हरणाच्या चपळाईनें उडी मारून, स्वर्गातील सुख जसें आणून दिलें तद्वतच त्याच शीघ्र गतीनें विविध प्रकारचें दुःखहि समाजापुढें निर्माण केलें. म्हणूनच प्रश्न असा कीं, प्रचलित जीवनांत श्रद्धेचें स्थान काय ? माझे मतें श्रद्धेला जीवनांत अतोनात महत्त्वाचें असें स्थान आहे. आणि मी तर असेंहि म्हणेन कीं, कोणत्याहि मानवाचें, समाजाचें किंवा राष्ट्राचें जीवन श्रद्धेशिवाय सुखीच होऊं शकणार नाहीं. जीवन सुखी करण्यास, सदाचारी करण्यास, श्रद्धेचा अवलंब निश्चित-पणें करावा लागतो.

कारण आपद्कालीं संकटाच्या वावटळींत सांपडलेल्या वाटसरूला श्रद्धा ही एक मोठ्या काठीचा आधार आहे. श्रद्धावान् माणसाचें अंतःकरण आपद्-कालींहि शांतच राहील. संकटांना तो धैर्यानें तोंड देतो. कारण आयुष्यांत सुख किंवा दुःख येणें म्हणजे दिवसामागून रात्र येणें व रात्रीमागून दिवस येणें असेंच समजतो व त्यामुळें आलेल्या संकटांना हा शूर वीराप्रमाणें न डगमगतां सामना देतो ! परंतु याचे उलट अश्रद्धावान माणसें मात्र गांगरून जातात ! परवांच एका लेखांत असें वाचल्याचें स्मरतें कीं, इंग्लंडमध्यें हल्लीं मानसिक दौर्बल्य फार वाढल्यानें वेडें होण्याचें प्रमाण वाढत चाललें आहे. तद्वत्च अमेरिकेंत आत्महत्त्येचें प्रमाण वाढतच चाललेलें आहे ! विज्ञानाच्या व बुद्धीच्या दालनांत, जास्तींत जास्त प्रगति केलेल्या राष्ट्रांच्या सामाजिक जीवनांत ह्या समस्या कां बरें उभ्या रहातात ? याचें उत्तर पाहिजे असल्यास कांहीं दिवसांपूर्वीं लोकनायक अणे यांची मुलाखत प्रसिद्ध झालेली होती त्यांतील उतारा वाचणें इष्ट होईल. ते म्हणतात, " आयुष्यांत

श्रद्धा किती मोलाची असते हें आम्हांस अनुभवण्यास मिळालें. पुढच्या पिढींत तिचा अभाव झाला त्यामुळें संकटाचे वेळीं धीरानें मार्ग काढण्याच्या कामीं अनेक तरुण गोंधळून गेलेले मला आढळले......मनुष्य मनन करूं लागला म्हणजे त्याच्यासुद्धां शक्ती जागृत होतात व यांतूनच मोठीं कामें पार पाडण्याचें सामर्थ्य मिळतें. पण या गोष्टींचा आनंद श्रद्धा नसलेल्या व्यक्तींना कसा मिळणार ? तद्वतच पूज्य न्यायविजयी महाराज ‘ अध्यात्म तत्त्वलोक ’ या ग्रंथांत म्हणतात, “ जन्मांतरवादाच्या सिद्धान्तामुळें परोपकाराची भावना पुष्ट होते व कर्तव्यपालनांत तत्परता येते. पुढील जन्माची श्रद्धा कर्तव्यमार्गावर स्थिर बनविते. ” ग्रेट ब्रिटनमधील एका साप्ताहिकानें ‘ श्रद्धा आणि बुद्धिप्रामाण्य ’ या विषयावर एक निबंध-स्पर्धा जाहीर केली होती व त्यानुसार श्री. वायकेन यांना पहिलें बक्षीस मिळालें. ते आपल्या लेखांत म्हणतात, “ माणूस एकाकी, निराधार, दुःखी असला तर परमेश्वर आपला सहाय्यक आहे ही नुसती कल्पना त्याला धीर देते......कष्टमय व नीरस जीवनांत धार्मिक श्रद्धेमुळें रस किंवा राम निर्माण होऊं शकतो......परित्यक्त, एकाकी, पंगू, पीडित व आसन्नमरण माणसें श्रद्धेचा निवारा शोधीतच असतात, श्रद्धाळू बनतात. ” सारांश, जीवनांत विशेषतः आपद्कालीं श्रद्धेचा फायदा किती होतो हें या विवेचनावरून लक्षांत येईल.

तद्वतच कोणतेंहि कार्य चिकाटीनें व श्रमानें यशस्वी जर करावयाचें असेल तर त्यासाठीं श्रद्धेची अतोनात आवश्यकता आहे. श्री. ना. सी. फडके म्हणतात, “ .....कोणत्या तरी जबरदस्त श्रद्धेशिवाय मानवाच्या हातून महत्कार्य घडत नहीं. हत्ती पराक्रमी खरा परंतु त्याला धांवपळ करावयास लावण्यासाठीं अंकुशाची गरज असते.--माणसालाहि कसली तरी टोंचणी लागल्याखेरीज त्याच्या ठिकाणीं कार्याची प्रवृत्ति होत नाहीं... आजच्या पिढीचें खरें दुर्दैव महायुद्धांत तीन कोटी माणसांचे मुडदे पडले व तिजोऱ्या रिकाम्या झाल्या हें नसून आपलीं अंतःकरणें रिकामी झालीं आहेत यांतच खरा धोका आहे ! मग तें कार्य व्यक्तीचें असो किंवा राष्ट्राचें असो ! कार्यांत श्रद्धा असणें अत्यावश्यक आहे. नुसत्या बुद्धीनें कोणतेंहि कार्य तडीस जाणें कठीण आहे. कारण बुद्धीचें कार्य चिकित्सा

करण्याचें आहे. कार्य कुठलें अन् अकार्य कुठलें हें बुद्धि ठरविते. परंतु तें कार्य सातत्यानें पुरें करण्यास भावनेची किंवा श्रद्धेची जोड लागते." पूज्य विनोबाजी म्हणतात, " बुद्धि हें कायदे बनविणारें खातें, मन हें अंमल-बजावणी खातें." शिवाजीमहाराजांजवळ असंख्य मावळेवीर गोळा झाले व त्यांनीं जें कार्य इतिहासांत अजरामर केलें तें बुद्धीमुळें कीं श्रद्धे-मुळें ? गांधीजींनीं सत्याग्रहाची हांक जनतेला दिल्यानंतर हजारों व लाखों सत्याग्रही स्वातंत्र्यासाठीं तयार झाले, व विविध ठिकाणीं लाठीमार व गोळ्या फुलांसारख्या झेलल्या त्या श्रद्धेमुळें कीं बुद्धीमुळें ? एरवीं स्वप्नांतहि खरें वाटणार नाहीं अशा प्रकारचा आदर्श हृदयपालट थोड्याशा का होईना पण धनिकवर्गांत 'भूदाना'च्या आंदोलनामुळें ज्या पू० विनोबांनीं निर्माण केला, व एक नवीन प्रकारचें त्यागाचें वातावरण समाजांत निर्माण केलें तें बुद्धीमुळें कीं श्रद्धेमुळें ? या सर्वांचें उत्तर एकच आहे कीं, श्रद्धेनें, श्रद्धेनें व श्रद्धेनें. हातीं घेतलेल्या कार्यांत कधींहि विचलित न होणारी श्रद्धा होती म्हणूनच हीं थोर थोर कार्यें होऊं शकलीं व होतील ! यांतील कांहीं कार्यें करण्यास जर निव्वळ शुष्क बुद्धिवाद्यांना सांगितलें असतें तर त्यांनीं कार्य करण्याऐवजीं शुष्क व नीरस अशी चर्चा मात्र भरपूर केली असती ! श्रद्धा असणारीं माणसेंच हातीं घेतलेलीं कामें चिकाटीनें पूर्ण करूं शकतात. अपयश आलें तर त्यामुळें त्यांचें मन विचलित होत नाहीं. तितक्याच जोमानें ते त्यांचें कार्य पुढें चालवितात. शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्याला, व्यापार करणाऱ्या विक्रेत्याला, प्रॅक्टिस करणाऱ्या वकिलाला व डॉक्टरला, संस्था चालविणाऱ्या चालकाला, राज-कारणाची धुरा वाहणाऱ्या देशभक्ताला—सर्वांना श्रद्धेची अतोनात गरज आहे, हें यावरून सिद्ध होईल.

अर्थात् श्रद्धा असणें म्हणजे जुन्या भाकडकथा यावर संपूर्ण विश्वास ठेवणें असें नव्हे ! उदात्त व थोर नीतितत्त्वावर विश्वास ठेवून, चिकाटीनें कार्य करणें हाच श्रद्धेचा सर्वसाधारण अर्थ डोळ्यांसमोर ठेवून हें विवेचन या लेखांत मीं केलेलें आहे. व या दृष्टीनें श्रद्धेचें महत्त्व वैयक्तिक व सामा-जिक जीवनांत किती आहे हें वाचकांच्या लक्षांत येईल.

# धर्म व क्रिया : २

'धर्म बुडाला, कांहीं ताळतंत्रच राहिला नाहीं' अशा प्रकारची तक्रार आपण वेळीं व अवेळीं ऐकत असतों. अशा प्रकारची तक्रार करणाऱ्या मंडळींत कांहीं वेळां केवळ क्रियेलाच धर्म मानणारे लोक असतात. म्हणून धर्म म्हणजेच क्रिया मानणें कितपत बरोबर व इष्ट आहे याचें विवेचन करण्याचें या लेखांत योजलेलें आहे.

जी मंडळी 'धर्म बुडाला, धर्म बुडाला' असा टाहो फोडतात त्यांची मुख्य तक्रार एकच कीं, 'हल्लींची तरुण मंडळी शेंडी ठेवीत नाहीं, जानवें वापरीत नाहीं, संध्या करीत नाहीं, वगैरे......' त्यांची बहुधा तक्रार अशी नसते कीं, 'हल्लीं नैतिक मूल्यांचा ऱ्हास झालेला दिसतो.' सुशिक्षित म्हणवून घेणारा वर्गहि 'पैसा हाच परमेश्वर' मानून पैशासाठीं वाटेल ती अधम व अनीतिकारक कृत्यें करण्यासाठीं मागेंपुढें पाहीनासा झालेला आहे... ... सारांश, कांहीं पुराणमतवादी मंडळी हल्लींचा तरुण वर्ग क्रियाकांडांचें पालन करीत नाहीं म्हणून 'धर्म बुडाला, धर्म बुडाला' अशा आशयाची हाकाटी पिटीत बसला आहे.

म्हणूनच प्रश्न असे उद्‌भवतात कीं, धर्म व क्रिया यांचा संबंध काय? मनुष्याला धार्मिक केव्हां म्हणायचें......? क्रियावान पण चारित्र्यहीन किंवा कमी चारित्र्य असणारा मनुष्य धार्मिक, कीं चारित्र्यवान परंतु क्रिया न करणारा मनुष्य धार्मिक? संध्या व पूजा करून अज्ञान व अनाथ पुतण्याची इस्टेट गिळंकृत करणारा मनुष्य धार्मिक, कीं सचोटीनें व प्रामाणिकपणानें व्यवहारांत लबाड्या न करणारा व चारित्र्यवान परंतु संध्या व पूजा न करणारा मनुष्य धार्मिक? लाखो रुपये काळ्याबाजारांत किंवा लांच खाऊन कमावून बसल्यावर सत्यनारायण करून पंढरीच्या विठोबाचें दर्शन करणारा मनुष्य धार्मिक, कीं धंदा करतांना समोर आलेलें गिऱ्हाईक

अगदीं गरीब व गरजू आहे म्हणून त्याला अत्यल्प नफ्यावर माल देणारा परंतु पंढरपूरला क्वचित् जाणारा व्यापारी धार्मिक? समोर आलेल्या पेशंटला एकाहि इंजेक्शनची जरूरी नसतांना १५ इंजेक्शनें देण्याचा 'सल्ला' देऊन गरीब बिचाऱ्या पेशंटचे शंभर रुपये लुबाडून एक एक तास देवाजवळ प्रार्थना करणारा डॉक्टर धार्मिक, कीं सेवा हाच धर्म समजून गोरगरिबांना मोफत औषध देणारा पण मूर्तिपूजा प्रसंगाप्रमाणें करणारा डॉक्टर धार्मिक? मला वाटतें या सर्व प्रश्नांच्या उत्तरांतच आपल्याला धर्म व क्रिया यांचा संबंध काय आहे हें कळेल.

ज्याप्रमाणें एखादी वस्तु किंवा बाब साध्य करण्याकरितां कांहीं साधनें लागतात त्याशिवाय ती वस्तु हस्तगत होत नाहीं त्याचप्रमाणें धर्माचा आश्रय घेण्यासाठीं आपणांस क्रिया कराव्या लागतील हें कबूल. उदा० क्षुधाशांति करण्यासाठीं भोजनाची आवश्यकता आहे हें कबूल व त्याप्रीत्यर्थ भोजनाची क्रिया केल्याशिवाय क्षुधा शांत होणार नाहीं हेंहि कबूल. मग भोजनाची क्रिया तुम्ही कशीहि करा. तुम्ही हातांत अन्न घेऊन भोजन करा, बशींत अन्न ठेवून भोजन करा, किंवा पितळींत भोजन करा. कोणत्या क्रियेनें पोटाची भूक शांत करतां हा मुद्दा गौण आहे. परंतु भूक शमन करण्यासाठीं भोजनाची क्रिया करणें आवश्यक आहे एवढेंच! कोणत्या प्रकारच्या क्रियेमुळें भोजन करतां हें पाहणें सर्वथैव गौण आहे. त्याचप्रमाणें धर्म व क्रियेचें आहे. धर्माचरण करण्याकरितां क्रियांची आवश्यकता आहे हें कबूल परंतु तुम्हीं कोणत्या क्रिया केल्या हा मुद्दा सर्वथैव गौण होय. कोणती का क्रिया असेना, त्याला महत्त्व निश्चितपणें कमी आहे. धर्माचरणास महत्त्व आहे, क्रियेस नाहीं. किंवा वरील उदाहरणापुरतें बोलावयाचें झाल्यास असेंहि म्हणतां येईल, फक्त जेवतांना आपण ज्याप्रमाणें हात हालविण्याची क्रिया करतों त्याप्रमाणें हात हालवून कांहीं पोटाची वखवख शांत होणार नाहीं! कसेंहि जेवण घ्या, पोटाला अन्न हवें—क्रिया नको तद्वतच क्रियेचें आहे व क्रियेचें महत्त्व एवढ्यापुरतेंच आहे ही गोष्ट विसरतां कामा नये.

आणि म्हणूनच मूलभूत प्रश्न असा कीं, एखाद्या व्यक्तीनें कांहीं क्रिया केल्या नाहींत तर तो अधार्मिक होतो का? त्याला पापी म्हणून संबोधतां

येतें का ?

माझे मतें असें म्हणतां येणार नाहीं. कारण धर्माचरण करतांना खरें महत्त्व चारित्र्यासच आहे, क्रियेला गौण स्थान आहे. कारण कालमानाप्रमाणें क्रिया बदलत असतात. एका वेळीं एक क्रिया करणें धर्माचरणास धरून आहे असें मानलें जात होतें तर दुसऱ्या वेळीं तीच क्रिया करणें धर्माचरणास धरून आहे, असें मानलें जाणार नाहीं. समाजांत कांहीं तत्त्वें चल असतात व कांहीं तत्त्वें अचल असतात आणि कालमानापरत्वें व देशपरत्वें कांहीं चालीरीती व रूढी बदलत असतात. त्या कशाप्रकारें व किती बदललेल्या आहेत याचें उत्कृष्ट विवेचन प्रा. द. के. केळकर यांनीं त्यांच्या ‘ उद्यांची संस्कृति ’ या ग्रंथांत केलेलें आहे. प्रा. केळकर म्हणतात, “ फार प्राचीन काळीं आज दैवी वाटणारी ‘ विवाह ’ ही संस्थाच मुळीं अस्तित्वांत नव्हती व समाजाच्या विकसितावस्थेंत ती कोणीतरी धर्माचार्यानें सुरू केली... ” महाभारतांतील आदिपर्वांत १२२ व्या अध्यायांत विवाहसंस्था कशी स्थापन झाली, याविषयीं पंडु कुंतीस म्हणतो, “ पूर्वीं एके काळीं स्त्रिया अनियंत्रित होत्या व त्या स्वेच्छेप्रमाणें स्वतंत्रतेनें विहार करीत. तरी पण त्यांना त्या काळीं अधर्म घडत नसे; कारण पूर्वीं तोच धर्म होता. हा धर्म सप्रमाण असून त्यास मोठमोठ्या ऋषींचीहि संमति आहे.”

प्राचीन काळीं बहीण-भावंडांमध्यें लग्नें होत असें ऋग्वेदांतील यम-यमी संवादसूक्तावरून दिसतें. अर्थात् हा काल फार प्राचीन असला पाहिजे. कारण यमीनें यमास भर्ता होण्याची प्रार्थना केली असतां यम म्हणतो कीं, “ हे सुभगे, तूं आतां माझ्याशिवाय दुसरा कोणीतरी पति शोधून काढ. कारण भावाबहिणींचीं लग्नें होण्याचीं युगें आतां गेलीं. ” ......विवाहानंतर स्त्री निपुत्रिक विधवा झाल्यास तिच्या पोटीं दीराकडून पुत्रोत्पत्ति करविण्याची ‘ नियोग ’ नांवाची पद्धति एके काळीं शिष्टसंमत होती.... अनेक भावांच्या समाईक मालकीची एकच पत्नि पूर्वीं असूं शके. याचें द्रौपदी हें सुप्रसिद्ध उदाहरण आहे. स्वतःची स्त्री अर्पण करून अतिथिसंतर्पण करण्याच्या चालीचाहि मत्स्यपुराणांत उल्लेख आहे वरील सर्व विवेचनावरून एक महत्त्वाची बाब लक्षांत येते कीं, पातिव्रत्यासारख्या पवित्र तत्त्वांतहि कालमानाप्रमाणें आपण केवढा आमूलाग्र फरक केलेला

आहे. पूर्वीं ज्या पद्धतीचें 'पातिव्रत्य' पाळलें जात होतें, त्या पद्धतीचें 'पातिव्रत्य' आज पाळलें जाणें शक्य आहे काय? मुळींच नाहीं— म्हणून पूर्वींचे लोक अधार्मिक अशी शेखी आपणांस मारतां येईल काय? तद्वतच पू. सानेगुरुजी 'भारतीय संस्कृतीं'त म्हणतात: हिंदू धर्म बुडाला असें कांहीं म्हणत असतात. कोणाच्या डोक्यावर शेंडी दिसली नाहीं व कपाळावर गंध दिसलें नाहीं, तोंडावर मिशी दिसली नाहीं, गळ्यांत जानवें दिसलें नाहीं म्हणजे त्यांना वाटतें कीं, धर्म रसातळास गेला!... ...

हीं बाह्य चिन्हें बदलतात व बदलणारच. नवीन कालांत नवीन चिन्हें निर्माण होत असतात. हिंदु धर्म कांहीं चहाच्या पेल्यांत बुडून जाण्याइतका किंवा मिशा काढतांच मरून जाण्याइतका लेचापेचा नाहीं. धर्मांतील यमरूप भाग बदलत नसतो. परंतु नियमरूप भाग बदलत असतो. सत्य, अहिंसा, संयम, दया, प्रेम इत्यादि गोष्टींना यम अशी संज्ञा आहे. संध्या करणें, स्नान करणें, खाणेंपिणें, जानवें घालणें, गंध लावणें, हजामत करणें इत्यादि गोष्टी नियमांत येतात. यम म्हणजे अचल धर्म व नियम म्हणजे चल धर्म. स्मृतींतून स्वच्छ सांगितलें आहे कीं, "यमाचा विचार न करतां केवळ नियमांनाच जेव्हां महत्त्व प्राप्त होतें, त्यावेळीं समाजाचा नाश होतो परंतु या स्मृतिवचनांचें स्मरणहि आम्हांस नाहीं. आज नियमांचें स्तोम आम्ही माजविलें आहे. जानवें, गंध, शेंडी यांचाच जणूं धर्म बनला आहे. यमाची आम्हांस कदर नाहीं. नियम म्हणजेच आमचें सर्वस्व!" क्रियेलाच धर्म मानणाऱ्या मंडळींना केवढें मौल्यवान् मार्गदर्शन आहे हें! त्यासाठीं दोन गमतीचीं उदाहरणें मीं येथें मुद्दाम नमूद करतों.

मेवाडचा राणा प्रताप याचा पराभव झाल्यावर त्याला रानावनांत जावें लागतें. त्यावेळीं त्यांनीं व त्यांच्या अनुयायांनीं अशी शपथ घेतली कीं, मरेपर्यंत मऊमऊ गादीवर बसणार नाहीं व चांदीच्या ताटांत जेवणार नाहीं. दुर्दैवानें राण्यास तसाच मृत्यु आला. त्याच्या मृत्यूनंतर ती निष्ठा त्याच्या शिष्यांमध्यें राहिली नाहीं व मुसलमान राजानेंहि त्यांना परत बोलाविलें, खंडणी दिली व हे शिष्य सुखांत राहूं लागले. परंतु जी शपथ घेतलेली होती, ती त्यांना बोचत होती. म्हणून त्यांतून त्यांनीं एक पळवाट

काढली. मऊमऊ बिछान्यावर ते झोंपत असत, परंतु बिछान्याचे खालीं एक बाभळीच्या झाडाची साल ठेवून देत ! चांदीच्या ताटांत जेवण घेत परंतु त्याचेखालीं एक वडाचें पान ठेवून देत. यामुळें शपथ पाळल्याचें पुण्य लागून, सुखहि भोगतां येऊं लागलें ! निष्क्रीय क्रिया केल्या म्हणजे त्या किती हास्यास्पद होतात याचें हें उत्कृष्ट उदाहरण आहे.

कै. बाळासाहेब खेर, मुरारजी देसाई इत्यादि पुढारी ४२ सालीं पुण्याला तुरुंगांत असतांना, त्यांनीं जेलरकडे अर्ज करून एकादशीचे दिवशीं जेवणाचे ऐवजीं फराळ वगैरे द्यावे अशा आशयाचा अर्ज केला व तो मंजूर झाला. नंतर त्यावेळीं जेलमध्यें एक जन्मठेप भोगणारा कैदी होता. त्यानेंहि अर्ज केला कीं उपवासाचे दिवशीं मलाहि फराळ हवा, जेवण नको. जेलरनें अर्ज नामंजूर केला व फटक्यांची शिक्षा देऊं असें सांगितलें तरीहि तो कैदी ऐकेना म्हणून जेलरनें बाळासाहेब खेर वगैरेंना सांगितलें कीं तुम्ही या कैद्याचें मन वळवा.

बाळासाहेब—" अरे तूं खून केलास ना ? "

कैदी—" हो. "

बाळासाहेब—" दरोडे घातलेस ना ? "

कैदी—" हो. "

बाळासाहेब—" मग हे उपवास कशाला ? "

कैदी—" साहेब मी हें सर्व कांहीं केलेलें आहे. परंतु **माझा धर्म** सोडलेला नाहीं ! "

धर्माची काय सुंदर कल्पना ! ' सर्व कांहीं केलें पण धर्म सोडलेला नाहीं ! ' फार सुंदर ! फक्त क्रियाकांडालाच धर्म मानणाऱ्या व्यक्तींना अत्यंत उपयुक्त व योग्य दाखला आहे हा ! त्या कैद्याचें वागणें जितकें हास्यास्पद तितकेंच हास्यास्पद वागणें आपलें आज दिसतें; कारण आज नीति व चारित्र्यावर भर न देतां आपण फक्त क्रियेवरच भर देत आहोंत. म्हणूनच आचार्य काकासाहेब कालेलकरहि म्हणतात, " धर्मवचनांचा उपयोग पीनलकोडाप्रमाणें न करतां वडिलांचा उपदेश किंवा सद्‌गुरूकडून मिळालेली दीक्षा अशा रूपानें त्यांचा स्वीकार करावा. उथळ विचारानें जुन्या व्यवस्थांत आपण बदल करतां कामा नये. पण खोल विचाराअंतीं

जुन्या व्यवस्थेला मुरड घालणें जर योग्य वाटलें तर धर्मनिष्ठांनीं तसा फेरफार केलाच पाहिजे. आणि जर जुन्या व्यवस्थेंत आमूलाग्र परिवर्तन करणें आवश्यक वाटलें तर तसें करण्याचीहि धार्मिकांची तयारी पाहिजे. शुद्ध धर्मतत्त्व हृदयाला पटल्यानंतर तें आपल्याला जेथें घेऊन जाईल तेथें जाण्याची आपली तयारी असलीच पाहिजे." पुढें आचार्य कालेलकर म्हणतात, "सत्य, अहिंसा, संयम वगैरे जीवनतत्त्वें देशकाळाच्या मर्यादेनें बद्ध नसून सार्वभौम आहेत. पण वर्णाश्रमव्यवस्थेसारखे समाजरचनेचे प्रकार एका काळीं इष्ट असले तरी दुसऱ्या काळीं ते तितके इष्ट ठरणार नाहींत. रोटीबेटी व्यवहाराचे आपल्या धर्मांतील नियम वेळोवेळीं युगधर्मा-प्रमाणें अथवा युगऱ्हासाप्रमाणें म्हणा वाटल्यास, बदलत आले आहेत."

सारांश, विशिष्ट क्रिया केल्यानेंच धर्म होत नाहीं. धर्म हा प्रामुख्यानें मनुष्याच्या चारित्र्यांत असतो. धर्मांतील जीं अचल तत्त्वें म्हणजे अहिंसा, सत्य इत्यादि या तत्त्वांचें पालन करणें म्हणजे धर्माचरण होय व या तत्त्वांचें पालन करण्याकरितां व सदाचार वाढण्याकरितां वेळोवेळीं क्रिया कराव्या लागतील हें कबूल.

सारांश, प्रा. वि. स. गोगटे म्हणतात त्याप्रमाणें "धर्माचरण म्हणजे केवळ नित्य-नैमित्तिक व विधिनिषेधात्मक गोष्टींत व व्रतवैकल्यांत दक्षता ठेवणें नव्हे तर या विधिनिषेधात्मक बाह्योपचारांच्या बुडाशीं जें अंतर्बाह्य पावित्र्याचें तत्त्व आहे त्याची जोपासना करणें होय हें आतां आपणांस कळूं लागलें आहे. 'संध्या, पूजा, टिळे, माळा, पोटीं क्रोधाचा उमाळा' ही दुःस्थिति आतां आपणांस असह्य व अक्षम्य वाटूं लागलेली आहे. धार्मिक रूढींचें व कायद्याचें अक्षरशः परंतु अंधपणें पालन करण्यापेक्षां त्या कायद्यांच्या मूळ हेतूकडे आपली नजर स्थिर होत चालली आहे."

वरील सर्व विवेचनावरून एकच गोष्ट सिद्ध होईल कीं, क्रिया म्हणजे धर्म नव्हे. याचें विवेचन विस्तृतपणानें करण्याचें कारण एकच कीं, आज समाजांतील एक वर्ग निव्वळ क्रियाचुस्त बनला आहे. परंतु आचरण मात्र सर्वस्वीं किंवा बव्हंशीं धर्मतत्त्वांना सोडून वागतांना दिसतें. 'मुंहमें राम, बगलमें सुरी' अशा प्रकारचेच 'महात्मे' समाजांत वावरतांना दिसतात. आणि दुर्दैव असें कीं, अशा प्रकारच्या क्रिया किंवा व्रतवैकल्यें खूप मोठ्या

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम २८२१६ विः ...
क्रमांक ९३१३ नों: दि: १५-२-६१


प्रमाणावर करणाऱ्या व्यक्तींना समाज 'धर्मात्मे' म्हणून मान देतें! म्हणून आज समाजांत, आचार किंवा चारित्र्य सुधरविण्याचा प्रचार फार कमी प्रमाणावर केला जातो. परन्तु धर्मगुरु क्रियाकांड मात्र भरपूर प्रमाणावर करवून घेतात, अशी आपल्या समाजाची दुःस्थिति आहे. देवळांत जाऊन भजन म्हणायचें. दया, क्षमा व शान्ति याचे स्तुतिपाठ मनसोक्त गावयाचे आणि प्रत्यक्ष व्यवहारांत जास्तींत जास्त क्रूर किंवा निर्दयी वागावयाचें हें आपण रोज पाहतों! शिक्षणाचे उच्च संस्कार घेऊन पदवीधर झालेला डॉक्टर किंवा वकील किंवा अधिकारीहि दैनंदिन व्यवहारांत पैशासाठीं वाटेल तेवढ्या लबाड्या करून गोरगरिबांना लुबाडतो! अशिक्षित व्यापारी तर हें करतोच पण सुशिक्षित म्हणवून घेणारा वर्गहि आचरणांत चारित्र्य तर आणत नाहींच परंतु वर मात्र 'अहो हें असंच चालायचं; हा व्यवहार आहे,' असें म्हणून त्याचें समर्थन मात्र करतो! आणि हें पाप झालेलें आहे हें जाणूनच कीं काय सायंकाळीं देवाची पूजा करतो. आणि ह्या चारित्र्यहीन व्यक्तींनाहि पुराणमतवादी मंडळी 'धार्मिक' म्हणून संबोधतात! वा रे न्याय!!

मग प्रश्न असा कीं, क्रियेला महत्त्वच नाहीं काय? नाहीं असें मुळींच नाहीं. उदा० जीवनांत संयम पाहिजे म्हणून संयमाची सवय होण्यासाठीं उपवास करणें निश्चित आवश्यक आहे. पण उपवासाची मूलभूत कल्पना लक्षांत घेणें आवश्यक आहे व उपवास हे संयमासाठीं आहेत हें लक्षांत घेऊन उपवासांत न खाणें हा धर्म होईल. उपवासाचे पदार्थ अजीर्ण होईपर्यंत खाणें हा धर्म नव्हे. तीच गोष्ट मूर्तिपूजा व प्रार्थना यांची. मनुष्य दैनंदिन जीवनांत व व्यवहारांत गुरफटलेला असतांना त्याला उच्च व उदात्त ध्येयें व आदर्श डोळ्यांसमोर ठेवणें कदाचित् अशक्य किंवा कठीण होतें. अशा वेळीं तुम्ही शांत व प्रसन्न मनानें परमेश्वरापुढें जर गेलांत व 'परमेश्वरा, तुझ्या अंगांत जेवढी सात्विकता होती तितकी माझ्या अंगांत येऊं दे,' अशी मनोमन प्रार्थना केली तरच ती खरी धर्मभावना शोभून दिसेल. नाहींतर वरुन परमेश्वरभक्तीची क्रिया व मनांत मात्र प्रार्थना अशी कीं, 'परमेश्वरा येनकेन प्रकारेण माझा बंगला लवकर होऊं दे'— तर त्या क्रियेंत कांहीं अर्थ आहे काय? किंवा वर नमूद केल्याप्रमाणें

काळाबाजार करून किंवा लांच खाऊन लाखो रुपये कमवावयाचे, त्याचा एक बंगला बांधावयाचा व मग धर्म आठवला म्हणजे एक सत्यनारायण करायचा. म्हणजे फिटलीं सर्व पापें! हा धर्म नाहीं पण धर्मद्रोह आहे, हें आपण लक्षांत ठेविलें पाहिजे. प्रार्थना करतांना आपण डोळे बंद करून मनानें जीं जीं वाईट कृत्यें केलीं त्याचा आढावा घेतला पाहिजे व अशीं कृत्यें यापुढें न करण्याची किंवा कमी करण्याची खटपट केली पाहिजे. डोळे बंद केल्यावर मनानें म्हणावें, 'अरेरे! त्या गरीब बिचाऱ्या 'अ' ची लांच घेऊन त्याला विनाकारण दुःखाच्या खाईंत लोटलें व त्रास दिला. अरेरे! माझ्या सुनेनें एवढीशी बारीक चूक केली, त्याबरोबर मी शांत राहण्याऐवजीं विनाकारण रागावलों. अरेरे! माझ्या नोकरानें एवढीशी बारीक चूक केल्याबरोबर मी त्याला उगीचच शिवीगाळ केली. आतां उद्यांपासून अशीं कृत्यें न होऊं देण्याचा निश्चय मी आज या प्रार्थनेद्वारां करीत आहें,' अशी प्रार्थना केली तरच ती प्रार्थना शोभून दिसेल, आचार व विचारांत सुधारणा होईल व अशा क्रिया केल्या तरच तो खरा धर्म होईल! सारांश, क्रिया म्हणजेच धर्म असें समीकरण न करतां कालमानापरत्वें योग्य क्रिया करून, धर्माचीं मुख्य तत्त्वें आचारांत व विचारांत आणण्याचा यत्न करावा. हाच क्रिया करण्याचा उद्देश असावा व हें लक्षांत ठेवून आपण क्रिया कराव्या.

# धार्मिक शिक्षणाची आवश्यकता : ३

धार्मिक शिक्षण म्हटल्याबरोबर कैक मंडळीच्या कपाळावर आंठ्या पडतील याची मला पूर्णपणें जाणीव आहे. विज्ञानशास्त्रानें व सुखोपभोगानें शृंगारलेल्या समाजांत, आज विज्ञान शिकण्याऐवजीं धार्मिक शिक्षण घेत बसावें असें सांगणें अगदीं चूक आहे, असा मुद्दा आग्रहानें पतिपादणारे पुष्कळ लोक भेटतील याची मला पूर्ण जाणीव आहे व विरोध लक्षांत घेऊनहि मी पुनःपुन्हां असें ठामपणानें सांगतों कीं, विज्ञानाचें परमसुख मानवाला जर हस्तगत करावयाचें असेल तर धार्मिक शिक्षणाची जीवनांत अत्यंत जरूरी आहे यांत तिळमात्र शंका नाहीं. पूर्वीच्या काळांत त्याची जरूरी जर शंभरपटीनें होती असें मानण्यांत आलें तर आजच्या काळांत त्याची जरूरी सहस्रपटीनें आहे हें लक्षांत घेणें आवश्यक आहे.

आजच्या काळांत धार्मिक शिक्षणाची आवश्यकता आहे कीं नाहीं हें पाहावयाचें आहे ना ? मग गेल्या सबंध वर्षांतील उच्च विद्याविभूषित व्यक्तींनीं केलेले फौजदारी गुन्हे लक्षांत घ्या बरें. पहा बरें तुम्हांस काय वाटतें ? अट्टल दरोडेखोरासहि लाजवील अशाप्रकारचे गुन्हे शिकलेल्या व्यक्तींनीं केल्यावर तुमचे मनावर काय परिणाम होतात बरें ? एक बातमी काय तर एका मोठ्या पुढारी डॉक्टरनें एका श्रीमंत विधवेचा खून केला म्हणून त्याला फांशीची शिक्षा देण्यांत आली. दुसरी बातमी काय तर म्हणे एका वैद्यमहाराजांनीं स्वतःच्या पत्नीच्याच विम्याची रक्कम हातांत पडावी म्हणून तिचा बळी घेतला. वगैरे. म्हणजे आजच्या आपल्या शिक्षणानें उच्च व पवित्र संस्कार देण्याचें कार्य होत नाहीं हें निश्चित. मग आदर्श नागरिक होण्याकरितां मानवावर पवित्र उच्च संस्कार देण्याचें कार्य कोणतें शिक्षण करणार ? देशांतील नागरिक दिवसानुदिवस अधिकाधिक नीतिमान् व चारित्र्यवान् व्हावेत असें जर आपणांस मनापासून खरोखरच वाटत

असेल तर धार्मिक शिक्षणाशिवाय आपला तरुणोपाय नाहीं हें आपण नक्की लक्षांत ठेवलें पाहिजे.

बाळ गंगाधर टिळकांनीं धार्मिक शिक्षणाचा पुरस्कार यथायोग्य शब्दांत केलेला आहे. लो. टिळक म्हणतात: बाल्यावस्थेंत मुलांच्या मनावर होणारे संस्कार चिरकाल टिकणारे असतात. मुलांचीं कोंवळीं मनें लहानपणींच जास्त संस्कारक्षम असतात. आणि अशावेळींच जर धर्माचा आणि नीतितत्त्वांचा ठसा त्यांच्या मनःफलकावर उमटवितां आला तर सर्व भावी आयुष्यालाच एक विशिष्ट वळण लागेल यांत शंका नाहीं. तेव्हां शिक्षणसंस्थांत ज्याप्रमाणें इतर पुष्कळ विषय शिकवितात त्याप्रमाणेंच नीतिशिक्षण व धर्मशिक्षण देतां आलें तर बरें—किंबहुना तें आवश्यक आहे.

सामान्य धर्मतत्त्वें त्रिकालाबाधित असतात. तेव्हां त्यांचें शिक्षण देणें मुळींच अवघड नाहीं. शिवाय नवीन पद्धतीनें तुलनात्मक धर्मविचारांचेंहि थोडेंसें शिक्षण दिलें असतां धर्मविचारांतील एककल्लीपणाचा दोष टाकून धर्मशिक्षणाचा गुण तेवढा तरुण मुलांस प्राप्त करून देणें शक्य आहे.

आदर्श व चारित्र्यवान नागरिक धार्मिक शिक्षण दिल्याखेरीज निर्माण होणार नाहींत, कारण धार्मिक तत्त्वांचे संस्कार मुलांच्या मनावर घडविल्याखेरीज चारित्र्यवान नागरिक भारताला लाभणार नाहींत. आणि राष्ट्रांत चारित्र्यवान नागरिक असल्याखेरीज लोकशाही यशस्वी होणेंच शक्य नाहीं. प्रा. पु. ग. सहस्रबुद्धे म्हणतात, "अमेरिकेंत विवाहसंस्था ही भग्न होत आहे. दर तीन विवाहांपैकीं एकाचा विच्छेद होतो आणि पुढील १०–१२ वर्षांत तें प्रमाण एकास एक असें होईल अशी समाजशास्त्रज्ञांना भीति आहे."

अमेरिकेंत गुप्त रोगांचें प्रमाण वाढतच आहे. कॉर्लवॉरन या पंडिताच्या मतें अमेरिकेंत गुप्त रोगांनीं दोन कोटी लोक ग्रस्त आहेत. अमेरिकेंत मादक द्रव्यांवर १४०० कोटी रुपये दरसाल खर्च होतात. या सर्व आपत्तींना तोंड देण्यासाठीं अमेरिकन शास्त्रज्ञ कोणता उपाय सुचवितात? चारित्र्य. समाजांतील तरुणांना नीतीचें, चारित्र्याचें, उदात्त ध्येयवादाचें, मनोनिग्रहाचें शिक्षण दिलें पाहिजे. यालाच जुन्या काळीं धर्म असें म्हणत. स्वार्थी, हृदयशून्य, चारित्र्यहीन मनुष्य कोणत्याहि शासनपद्धतींतून, कोणत्याहि

समाजरचनेंतून वाटेल ते अनर्थ घडवूं शकतो, हें इतिहासांत पावलोपावलीं आपल्याला दिसून येत आहे....... मानवाची नीति व चारित्र्य यांची पातळी वाढली नाहीं तोंपर्यंत राष्ट्रीयीकरण ही फारच मोठी आपत्ति आहे हें आपण कधींहि विसरूं नये....... चारित्र्यधन जर आपण आतां प्राप्त करून घेतलें नाहीं, तर अमेरिकेप्रमाणें येथें ठगपेंढारशाही सुरू होईल. चारित्र्यधन हें इतर धनाप्रमाणें आयात करतां येत नाहीं. तें मानवाच्या चित्तांतच प्रगट व्हावें लागतें. आणि ही भूमि तर सध्यां येथें अगदीं नापिक झाली आहे...... महाभारतांत म्हटल्याप्रमाणें 'जो मनुष्य धनाचा स्वामी असून इंद्रियाचा दास असतो तो त्या इंद्रियाच्या दाबामुळें धनैश्वर्यापासून भ्रष्ट होतो.' भारताच्या तरुण पिढीनें या व्यासवचनाचें चांगलें अध्ययन केलें तर स्वाधीन असलेलें इंद्रियांचें स्वामित्व म्हणजेच त्याग, ध्येयवाद किंवा चारित्र्य त्यांना प्राप्त होईल. म्हणून आपणांस भारतांत जर खऱ्या अर्थानें लोकशाही रुजवावयाची असेल तर धार्मिक शिक्षण सक्तीचें करणें आवश्यक आहे. भारतांतीलच नव्हे तर जगांतील कोणत्याहि थोर पुरुषाचें जर चरित्र आपण लक्षांत घेतलें तर आपणांस असेंच आढळून येईल कीं, त्या सर्व थोर पुरुषांचें जीवन लहानपणीं धार्मिक शिक्षणाचे संस्कार देऊन घडविलेलें आहे व त्यामुळेंच त्या व्यक्तींना थोरत्व प्राप्त झालेलें आहे.

मग प्रश्न असा कीं, धार्मिक शिक्षण देतांना दृष्टि काय ठेवावयाची ? कोणत्या प्रकारचें धार्मिक शिक्षण द्यावयाचें ? ज्या शिक्षणांत फक्त क्रियाकांडाचेंच महत्त्व व शिक्षण दिलें जातें तेंच शिक्षण द्यावयाचें, कीं ज्या शिक्षणांत सर्वसंमत धार्मिक मूलभूत तत्त्वें शिकविलीं जातात असें शिक्षण द्यावयाचें ? अर्थात् ज्या शिक्षणांत सर्व धर्मतत्त्वांचा समावेश होतो अशाच प्रकारचें शिक्षण देणें आवश्यक आहे. कारण धार्मिक शिक्षणाचा मूळ हेतु मानवाचीं मनें विशाल करण्याचा आहे. फक्त क्रियाकांडाचें शिक्षण दिल्यानें मानवाचीं मनें उदार व विशाल होणार नाहींत, परंतु संकुचित राहतील. स्वतःचा धर्म व त्याचा पंथ–उपपंथ चांगला, इतर सर्व धर्मपंथ व उपपंथ वाईट अशी प्रवृत्ति निर्माण होते. कांहीं प्रसंगीं इतर सर्व धर्मांविषयीं मत्सर व असुयाहि निर्माण होते. म्हणून सर्व धर्मतत्त्वांचें आधुनिक दृष्टि-

कोनांतून तुलनात्मक दृष्टीनेंच शिक्षण द्यावयास पाहिजे व तेंच खरें धार्मिक शिक्षण होय. अर्थात् क्रियाकांडाचे शिक्षणासहि अवश्य महत्त्व आहेच, परंतु तें शिक्षण सक्तीचें असूं नये, खुषीचें असावें. आणि तें शिक्षण देतांना विद्यार्थ्यांचे पुढें फक्त एकांगी ज्ञानच फेकूं नये. त्या मतप्रणालीवर जेवढी उलट सुलट मतें उपलब्ध असतील त्या सर्व मतप्रवाहांचा परामर्ष त्या धार्मिक शिक्षणानें विद्यार्थ्यांचे समोर घेतला पाहिजे. मानवमात्रांचीं हृदयें व मनें विशाल व्हावींत म्हणून डॉ. ॲनी बेझंट म्हणतात :

" If you have the will to do it the heart to do it, the Courage to do it then you may make an education which will change the face of your civilisation and all will have a life & really worth the living, noble in its aims, beautiful in its surroundings, great in its achievements, the life of which man is capable for which man is intended."

म्हणून आजच्या मानवाच्या हृदयांत उदारता येण्याकरितां, मानवाचीं मनें सागरासारखीं विशाल बनण्याकरितां धार्मिक शिक्षण सर्व शाळा-कॉलेजांतून सक्तीचें करणें हें सरकारचें आद्य कर्तव्य होय. या बाबतींत आपल्या प्रांताचे गव्हर्नर श्री. श्रीप्रकाश यांच्या अध्यक्षतेखालीं सरकारनें एक कमिटी नेमली आहे व त्या कमिटीचा रिपोर्ट नुकताच प्रसिद्ध झाला आहे. या कमिटीच्या शिफारसी लक्षांत घेऊन सरकार याबाबत योग्य तें धोरण आंखण्याचा विचार करील अशी आपण आशा धरूं या.

# सुशिक्षित मुलींच्या विवाहाचा प्रश्न : ४

प्रचलित समाजांत प्रौढ कुमारिकांच्या व विशेषतः सुशिक्षित कुमारिकांच्या लग्नाचा प्रश्न जास्त कठीण होत चाललेला आहे व या प्रश्नावर कांहीं प्रसंगीं वेगवेगळ्या वृत्तपत्रांतून व मासिकांतून चर्चाहि होतांना आढळते. म्हणून या प्रश्नावर माझे विचार मांडण्याचें मीं योजिलेलें आहे.

हल्लीं जास्त शिकलेल्या मुलींशीं लग्न करण्यांत पुरुषाला भीति वाटत असते, ही गोष्ट कांहीं अंशीं खरी आहे. कारण पुरुषाला केव्हांहि असेंच वाटणार कीं, ही आपली भावी सुशिक्षित पत्नि आपल्याला नेहमीं मुठींतच धरणार ! परंतु माझे मतें पुरुषवर्गानें अशा आशयाची भीति बाळगणें इष्ट नव्हे. कारण कांहीं अशिक्षित स्त्रिया आपले नवरे मुठींत ठेवीत नाहींत काय ? तेव्हां सुशिक्षित स्त्रिया असें वागतील व अशिक्षित स्त्रिया असें करणार नाहींत असा सिद्धान्त मनाशीं सर्वथैव मानणें हें अगदींच चूक आहे. तें प्रत्येक स्त्रीच्या मूळ स्वभावावर अवलंबून आहे. तेव्हां पुरुषवर्गानें सुशिक्षित स्त्रियांबाबत जो ग्रह कांहीं वेळां केलेला दिसतो, तशाप्रकारचा ग्रह काढून टाकावा. सारांश, अशा या वृत्तीचा व शिक्षणाचा काडीमात्र संबंध नाहीं, हें पुरुषवर्गानें पक्कें लक्षांत ठेवावें. पुरुषवर्गानें असें समजावयास हवें कीं, यदाकदाचित् एखाद्या स्त्रीच्या स्वभावांत जर कांहीं दोष आढळला तर तो दोष पदवीमुळें आलेला नाहीं. तर उपजतच त्या स्त्रीच्या अंगीं तो असतो. म्हणून त्या दोषाचें खापर त्या स्त्रीच्या पदवीवर किंवा शिक्षणावर टाकणें सर्वस्वीं चूक होय अशा आशयाची विचारसरणी जर समाजांत प्रचलित झाली तर पदवीधर किंवा सुशिक्षित स्त्रियांचे विवाहांच्या प्रश्नाचें स्वरूप पुष्कळच पालटल्याचें आपणांस दिसून येईल.

माझ्या मतें हा प्रश्न सोडविण्यासाठीं आणखी एका गोष्टीची जरूरी

आहे. ती गोष्ट म्हणजे मुलांच्या व मुलींच्या लग्नाच्या वयाची होय. कांहीं वेळां समाजांत अशीं उदाहरणें दिसतात कीं, लग्नाच्या वयांत स्वतःच्या पत्नीविषयीं किंवा पतीविषयीं मुलें किंवा मुली अत्यंत अव्यवहार्य अशा अपेक्षा बाळगतात. अशा वेळीं योग्य वयांत लग्न जुळणें शक्य असतें. परंतु यांच्या फाजील अपेक्षा आडव्या येतात व मग त्यावेळीं लग्न राहून जातें आणि एकदां वय निघून गेलें मग मात्र या प्रश्नाला फारच गंभीर स्वरूप येतें. योग्य वयांतच लग्न होणें इष्ट आहे. परंतु पुष्कळ प्रसंगीं त्यावेळीं लग्न टाळलें जातें. कोणी म्हणतो नोकरी ' कायम ' नाहीं, तर कोणी म्हणतो, ' प्रमोशन ' मिळाल्यावर लग्न करूं वगैरे. सर्वसाधारणरीत्या लग्नें लांबणी-वर टाकण्याकडे प्रवृत्ति जास्त झालेली दिसते व त्यामुळें असे प्रश्न समाजा-पुढें उभे राहिलेले दिसतात. म्हणून जर योग्य वयांत विवाह करण्याचें मुलांनीं, मुलींनीं व पालकांनीं ठरविलें, तर मला वाटतें हा प्रश्न फार सोपा होऊन बसेल ! कारण संकटें येणारच जर असतील तर ती नोकरी ' कायम ' झाल्यानंतर किंवा ' प्रमोशन ' मिळाल्यानंतरहि येतील ! तेव्हां वृथा बुजगावणें डोळ्यांसमोर ठेवण्यांत कांहींहि अर्थ नाहीं. म्हणून प्रत्येक मुलानें, मुलीनें वयांत आल्यानंतर जर लग्न करण्याचें ठरविलें तर हा प्रश्न सुटण्यास पुष्कळच मदत होईल !

कांहीं वर्षांपूर्वीं प्रसिद्ध झालेल्या ' सकाळ 'च्या एका अंकांत श्री. श्रीपाद जोशी यांनीं नमूद केलेला एक मुद्दा विशेष विचार करण्यासारखा आहे. ते आपल्या लेखांत म्हणतात, " सुंदर सुंदर मुली बहुधा शिक्षण चालू असतांच किंवा शिक्षण संपतांच ' खपून ' जातात. आणि पुरुषांच्या दृष्टीनें ' गाळ माल ' शिल्लक उरतो. माझ्या मतें लग्नाची लावलेली ही कांहीं पुरुषवर्गाची अपेक्षा दोषार्ह आहे. संसारांत सुख मिळतें तें फक्त सौंदर्यामुळेंच नव्हे. सुस्वरूप स्त्री असली परंतु स्वभाव चांगला नसला तर त्या संसारांत सुख कधीं तरी निर्माण होईल काय ? किंवा सुस्वरूप स्त्री असली व स्वतःच्या पतीच्या उत्पन्नाच्या चौकटींत संसाराचा मेळ जर त्या स्त्रीला बसवतां येत नसला तर त्या संसारांत सुख निर्माण होईल काय ? तेव्हां पुरुषवर्गानें पत्नीची निवड करतांना निव्वळ सौंदर्याकडे पाहणें अगदींच चूक होय." पू. साने गुरुजी म्हणतात, " देहाच्या आंत असलेला आत्मा

ओळखून त्याची गांठ घेतली पाहिजे. मनुष्य अंगणांतून ओसरीवर येतो, माजघरांत येतो, मग देवघरांत जातो. तसें वधूवरांनीं परस्परांच्या हृदयांतील देवघरांत शिरलें पाहिजे. माझ्या फक्त देहाची पूजा करणारा पति माझा अपमान करतो असें वाटलें पाहिजे. पतिपत्नींनीं परस्परांस मातीचे गोळे समजूं नये. हळूहळू या मातीच्या आंत जी उदात्तता, जी वर जाण्याची शक्ति आहे, तिच्यावर परस्परांनीं ध्यान दिलें पाहिजे...... दिव्याच्या कांचेला आंतील ज्योतीमुळें महत्त्व आहे. त्या ज्योतीमुळें आपण उपासक झालें पाहिजे. हा महत्त्वाचा विचार सर्व तरुणांनीं डोळ्यांपुढें ठेवणें अत्यंत इष्ट आहे. व प्रसंगीं रूपानें कमी पण गुणानें सुंदर अशा मुली मुलांनीं स्वीकारल्या पाहिजेत. कारण संसाराचें सुख हें निव्वळ सौंदर्यावर नाहीं, गुणांवर आहे. म्हणून प्रत्येक मुलानें गुणाकडे पाहावें, सौंदर्याकडेच पाहूं नये. आणि ही दृष्टि जर आमच्या मुलांनीं डोळ्यांसमोर ठेवली तर हा प्रश्न पुष्कळच सुलभ होईल.

कांहीं प्रसंगीं उत्तम विदुषीचाहि विवाह रूपामुळें होत नाहीं असें दिसतें. ही अवस्था अत्यंत विचारणीय आहे—इतकेंच नव्हे तर माझ्या नम्र मतें, सुसंस्कृत समाजांत असें होणें अत्यंत अनिष्ट आहे आणि अशी विचारसरणी असणें हें असंस्कृतपणाचें लक्षण होय. कारण समाजांत गुणाला मान असूं नये हें इष्ट आहे काय? मुळींच नाहीं व अशी अवस्था असणें सर्वथैव अनिष्ट आहे. म्हणून मुलांनीं पत्नीची निवड करतांना गुणांकडे दृष्टि ठेवावी म्हणजे हा प्रश्न पुष्कळसा सोपा होईल. कांहीं वेळां असें सुचविलें जातें कीं, विवाहाचा प्रश्न सोडविण्यासाठीं कॉलेजमध्यें प्रेमविवाह जुळवावेत. परंतु मुला-मुलींनीं कॉलेजांतच लग्नें जुळविण्याच्या कल्पनेंत मला मात्र एक मोठा धोका वाटतो. कारण भावनेच्या भरांत योग्य निवड होईलच असें सांगतां येत नाहीं. पुष्कळशा प्रेमविवाहांचे अंत दुःखद पाहण्यास सांपडतात त्याचें कारण हेंच! कॉलेजांतील मुली व मुलें अनुभवानें व विचारानें तितकीशीं परिपक्व नसतात व पुढील आयुष्यांत आपलें जुळेल कीं नाहीं, पुढील आयुष्यांत जर मतभेदांचें किंवा संकटांचें वादळ उठलें तर आपलें जुळेल कीं नाहीं हें जाणण्याची दूरदृष्टि त्या मुलामुलींना असतेच असें सांगतां येणार नाहीं. परंतु एवढें मात्र

म्हणतां येईल कीं, कॉलेजमध्यें किंवा इतरत्र जर असे विवाह जुळले तर ते विवाह त्या मुलांमुलींनीं त्यांच्या पालकांच्या किंवा दुसऱ्या अनुभवी माणसाच्या सल्ल्यानेंच करावेत. म्हणजे वर नमूद केलेला धोका टाळला जाईल व विवाहहि सुखाचे होतील.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
१०८५८

## अशी आहे ही अमेरिका : ५

पाश्चात्यांचें अंधानुकरण करण्याची आपली खोड फार जुनी आहे. " अस्सं ' फॉरिन ' ला नाहीं...... ' इंडियांत ' असंच चालायचं..." वगैरे प्रकारचीं मतें आपण नेहमीं ऐकतों. ' बालात् अपि सुभाषितं ग्राह्यम् ' या म्हणीप्रमाणें कोणत्याहि व्यक्तीचे, समाजाचे, धर्माचे किंवा राष्ट्राचे चांगले गुण आपण अवश्यमेव लक्षांत घ्यावेत.—एवढेंच नव्हे तर प्रत्येक व्यक्ति, समाज, धर्म आणि राष्ट्र यांचा आपण सूक्ष्म अभ्यास करून आपणांस जे जे गुण ग्राह्य वाटतील ते सर्व गुण आपण अवश्यमेव अंगीं बाळगण्याचा यत्न करावा व आपले दोष दूर करण्याचा यत्न करावा. आपण आपल्या अंगीं अशी अभ्यासू व जिज्ञासावृत्ति ठेवली तरच आपली, समाजाची, धर्माची व राष्ट्राची उन्नति होईल यांत तिळमात्रहि शंका नाहीं. परंतु ज्यावेळीं पाश्चात्यांचें सर्व कांहीं चांगलें व आपलें सर्व वाईट अशी प्रवृत्ति समाजांत निर्माण होते, त्यावेळीं समाजानें शांतपणानें विचार करणें अत्यावश्यक आहे व तसा थोडाफार प्रकार अमेरिकन जीवनाच्या बाबतींत झालेला आहे.

भौतिक सुखाची परमावधि अमेरिकेंत झालेली आहे यांत तिळमात्र शंका नाहीं व म्हणून जें जें अमेरिकेंत आहे, तें तें सर्व चांगलें असें समजून त्या संस्कृतीची शंभर टक्के आयात करण्याचा मोह आमच्या कांहीं भारतीयांना होतो. परंतु कुटुंबसंस्था, विवाहसंस्था यांची तेथें काय भीषण परिस्थिति आहे? व तेथील समाजापुढें त्यामुळें कोणकोणते अडचणीचे प्रश्न निर्माण झालेले आहेत त्याचें विवेचन अमेरिकेंत जाऊन आलेल्या कांहीं भारतीयांनीं व इतर व्यक्तींनीं वेगवेगळ्या वृत्तपत्रांत प्रसिद्ध केलेलें आहे, त्याचे उतारे मी येथें उद्धृत करीत आहें.

त्यावरून आपणांस योग्य तो बोध होईलच व तेथील समाजापुढें व राष्ट्रापुढें निर्माण झालेले प्रश्न व समस्या लक्षांत घेऊन आपण ते प्रश्न व समस्या आपल्या समाजापुढें व राष्ट्रापुढें येऊ न देण्याची खबरदारी घ्यावयास पाहिजे. म्हणून अमेरिकन जीवन कसें आहे हें आतां पाहा:—

[ खालील विवेचनांत अर्थात् माझें स्वतःचें कांहींच नाहीं परंतु तेथील कुटुंबसंस्था व विवाहसंस्था कोणत्या थराला गेलेली आहे हें पाहिलें म्हणजे मन अत्यंत उद्विग्न होतें. त्या अनुभवाचा फायदा घेणेंच शहाणपणाचें ठरेल. ]

## – १ –

### [ ‘ साधना ’ मासिक ९–३–५७ : विल्फ्रेड वेलॉक ]

“ मी नुकताच अमेरिकेंतून माझा व्याख्यानांचा दौरा आटोपून परतलों. या दौऱ्यांत मीं जें कांहीं ऐकलें, पाहिलें त्यांतून एक गोष्ट माझ्या मनांत विशेष ठसली. मला अमेरिकेंत सर्वत्र एकप्रकारची विचित्र अवस्था नजरेस पडली, समृद्धींतहि ही अवस्था सर्वत्र प्रकर्षानें आढळत होती... समाजाच्या कुठल्याहि घरांतील इसमाजवळ पुरेसें आहे असें दिसत नाहीं. कर्जबाजारीपणा सतत वाढत आहे. पुष्कळसे लोक २–२ नोकऱ्या करतांना दिसतात......संध्याकाळच्या वेळींहि ते कुठें ना कुठें तरी राबत असतात......कुटुंबांतल्या जमाखर्चाचा मेळ घालणें अवघड जात असल्यानें विवाहित स्त्रियाहि नोकरी करतांना आढळतात. घरांत पैसा भरपूर आला तरी तो हजार वाटांनीं वांटून जातो. त्यावर कांहींतरी नियंत्रण पाहिजे. आणि हें नियंत्रण एखाद्या विचाराचें, धर्माचें वा तत्त्वज्ञानाचेंच असलें पाहिजे. याचाच अर्थ त्याच्यासमोर जीवनाचा कांहींतरी आदर्श असला पाहिजे. कापड-चोपड, खाणेंपिणें, राहण्याची व्यवस्था यावर कितीतरी पैसा खर्च करावा लागतो. हें त्या जीवनादर्शामुळेंच व्यक्तीला उमजलें पाहिजे. वेगवेगळ्या गरजा भागविण्यासाठीं मालावर आणि विविध सेवांवर किती प्रमाणांत पैसा खर्च करणें उचित आहे हें त्याला समजलें पाहिजे.

......अमेरिकन माणसाला कुठलेंहि उपकरण पाहिलें कीं, तें हवेंच

असतें. हीं उपकरणें वेळ वांचविण्यासाठीं उपयोगी आहेत असें कोणीतरी सांगतें पण वेळ म्हणजे का सर्वस्व आहे ?

......अमेरिकेंत गेल्यावर माझ्यापुढें न सुटणारा असा एक प्रश्न होता. मला वाटे दर आठवड्याला मिळणारे ऐंशी ते शंभर डॉलर हे लोक खर्च तरी कसे करीत असतील ? परंतु असें आढळलें कीं, यांतले बरेचसे पैसे घर, मोटार, टेलिव्हिजन, यांत्रिक उपकरणें आणि फर्निचर यांचे हप्ते चुकते करण्यांत खर्च होतात......त्यांतील कितीतरी वस्तू अशा असतात कीं, त्या माझ्यासारखा मनुष्य सोडून देईल. कारण त्या केवळ चैनीखातरच घेतलेल्या असतात. परंतु अमेरिकेंत मात्र त्या चैनीच्या समजल्या जात नाहींत, तर प्रत्येक घरांत त्यांना गरजेचें स्वरूप आलेलें दिसतें. सबंध कुटुंबाच्या कुटुंबानें बाहेर जेवायला जाण्याचा अमेरिकेंत रिवाज घडत आहे. पण दर-वेळीं बरेचसे डॉलर त्यांत उडून जातात. हातापायांनीं ज्या क्रिया सहज करतां येण्यासारख्या आहेत त्या करणारीं यांत्रिक उपकरणें आहेत, मोटारी-सारखीं वाहनें आहेत......चालणें प्रकृतीला फायदेशीर असतें.—पण अमेरिकन नागरिक हें करीत नाहीं. ''

– २ –

[ केसरी २-११-५८ (पृ. ५) : जयंतराव टिळक ]

अमेरिकेंतील एका हिंदी विद्यार्थ्यांवर १६-१७ वर्षांच्या दोघां मुलांनीं हल्ले केले. त्याचा पोलिसांनीं जबाब घेतला त्यावरून सुचलेले विचार उद्धृत केलेले आहेत.

“ पोलिसापुढें दिलेल्या जबाबांत मुलांनीं स्पष्टपणें म्हटलें आहे कीं, शनिवारीं रात्रीं मजा मारण्यासाठीं कोणाचा तरी बळी घ्यावयाचा असें आम्हीं ठरविलें होतें. गुन्हेगारी वृत्ति इतक्या भयंकर प्रमाणांत कुमार-वयांतील मुलांमध्यें बळावण्याचीं कारणें माझ्या मतें अतिरेकी स्वैराचाराची मोकळीक, मोडकळीस आलेली कुटुंबसंस्था व हातीं आलेला अमाप पैसा हींच असावींत. मी एकदोन चांगल्या कुटुंबांतून राहिलों तेव्हां असाच अनुभव आला कीं अमेरिकन मुलांना ज्ञानसंपादनाचीं साधनें जशीं भरपूर उपलब्ध आहेत तशींच त्यांच्यावर कुसंस्कार करणारीं साधनेंहि

फार मोठ्या प्रमाणांत हातीं आहेत. घराघरांतून टेलिव्हिजनची सोय असल्यामुळें अद्ययावत् ज्ञानसाधन मुलांच्या हाताशीं असतें, परंतु साहस-वादाच्या नांवाखालीं टेलिव्हिजनवर खुनी–दरवडेखोरांचा ' हीरो ' म्हणून गौरव होत असतो. रंगीबेरंगी व्यंगचित्रांतून गुन्हेगारांची भरपूर प्रशंसा प्रच्छन्नपणें केली जाते, त्यामुळें केवळ मजा म्हणून फौजदारी गुन्हे करण्यास लहान मुलें प्रवृत्त झाल्याचीं उदाहरणें येथें घडलीं आहेत. फिलाडेल्फिया-मध्यें असे गुन्हे वीस टक्क्यांनीं वाढले असल्याची माहिती तेथील मुक्कामांत मला मिळाली. आज तरी अमेरिकेमध्यें मुलांचा हूडपणा हा मोठा काळजीचा विषय होऊन बसला आहे.

......जाहिरातबाजीचें गिऱ्हाइकावरील दडपण दररोज किती मोठ्या प्रमाणावर वाढत असतें हें येथील व्यवहार समक्ष पाहणाराला चांगलें जाणवतें. कृत्रिम गरजा किंवा गॅल्ब्रेथ याच्या शब्दांत सांगावयाचें तर ' परावलंबी ' गरजा गिऱ्हाइकामध्यें प्रसृत केल्यामुळें बाजारांत एक प्रकारची अस्थिरता सतत दिसून येते. कामगारांचें वेतन आणि एकंदरींत किंमतीची पातळी हळूहळू का होईना पण सारखी वाढतच असते. या घालमेलींत रस्ते, सफाई, शिक्षण, संशोधन अथवा संरक्षण या-सारख्या सार्वजनिक स्वरुपाच्या कार्यांकडे दुर्लक्षच होतें. अशा रीतीनें कृत्रिम गरजेच्या मालाचें वाजवीपेक्षां जास्त उत्पादन, त्याच्या उठावासाठीं अधिक जाहिरातबाजी, त्यांतून वेतनश्रेणी व किंमतीची पातळी वाढत जाणें, अखेरीस अचानकपणें ओढवणाऱ्या मंदीची भीति हें लेखकानें ' ॲफ्युएंट ' म्हणजे विलासी समाजाचें लक्षण सांगितलें आहे. वरील भोवऱ्यांतून समाजाला बाहेर काढण्यासाठीं सरकारनें मोठ्या प्रमाणांत हस्तक्षेप केला तर चलनवाढ होते असाहि पेंच लेखकानें मांडून दाखविला आहे. अर्थात् विलासी समाजाच्या या समस्या अमेरिकेंत जितक्या चिंताजनक वाटतात तितक्या ब्रिटनमध्यें निकडीच्या भासत नाहींत, मग दरिद्री भारताची गोष्ट तर दूरच राहो.

## – ३ –

**[ ‘ वसंत ’ दिवाळी अंक १९५८ : डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे ]**

......अमेरिका हा देश किती श्रीमंत आहे याची साधारण कल्पना आपल्याकडे सर्वांना आहेच. तेथील वर्णनें वाचून स्वर्ग, कुबेरनगरी या पुराणांतल्या कल्पना साकार झाल्या आहेत असें वाटतें......आपला ( सर्व गणराज्याचा धरून ) अर्थसंकल्प १५०० कोटी रुपयांचा आहे. **अमेरिकेंत दरसाल १६०० कोटींच्या सिगारेट्स खपतात.....** सामान्य मजुरासहि तेथें महिन्याला ६००–७०० रु. पगार असतो. त्यामुळें अन्नवस्त्राची प्राथमिक भूक भागत नाहीं असा तेथें कोणीच नाहीं. कामवासनेच्या बाबतींत तर आपल्या तुलनेनें तेथें निर्बंधच नाहींत असें म्हणावें लागेल. १६–१७ व्या वर्षापासून तरुण–तरुणींना तेथें परस्परांचा निकट सहवास आणि स्पर्शसुख लाभूं शकतें. स्त्रीच्या जीवनाचा संपूर्ण विकास होण्यास तेथें पूर्ण अवसर आहे. अशा अमेरिकेंत आतांपर्यंतच्या कोणत्याच देशांत नसेल झालें इतकें गुन्हेगारीचें प्रमाण वाढलेलें आहे... अमेरिकेंतील गुन्हेगारीचा इतिहास जगाच्या प्रशस्तीबद्दलची आशा जळून खाक होते......व्यापार, कारखानदारी, वाहतूक यासारखींच तेथें ‘ क्राईम सिंडिकेट्स् ’ असतात. चेअरमन, बोर्ड ऑफ डायरेक्टर्स ही सर्व व्यवस्था असते...आणि न्यूयॉर्क वगैरे शहरांत ज्या भागांत मोठमोठे भांडवलदार, पेढीवाले, व्यापारी, कारखानदार यांच्या कचेऱ्या असतात... हे गुन्हेगार राजवाड्याजवळच्या उंच प्रासादांत राहतात...बँकांवर दरोडा ही अमेरिकन जीवनांतील महत्त्वाची बाब झाली आहे. दरसाल सुमारें १२० कोटी रुपयांपर्यंत यांतून लूट होत असते. मोटारीच्या चोऱ्या ही दैनंदिन गोष्ट आहे. या धंद्यांतील संघटना इतकी कार्यक्षम आहे कीं, मोटार चोरल्यापासून एकदोन दिवसांच्या आंत तिचे सुटे भाग निरनिराळ्या दहा शहरांत पोहोंचविले जातात. आणि त्यांतून नव्या मोटारी तयार होऊन विकल्या जातात. अमेरिकेंत १९४९ सालीं १६ लक्ष २६ हजार गुन्हे झाले......दर १८ सेकंदाला एक असें साधारण प्रमाण आहे. दर दिवशीं ३६ खून, १५० दरोडे व २२५ बलात्कार आणि हें प्रमाण

उत्तरोत्तर वाढतच आहे असें या क्षेत्रांतील शास्त्रज्ञ सांगतात. अमेरिकेंत सर्वत्र दहशतीचें वातावरण होऊन बसलें आहे असें आजचे तज्ज्ञ सांगत आहेत.

......गुन्हेगारी भयानक स्वरुपांत वाढत असतांना अमेरिकनांसारख प्रगत व कार्यक्षम लोक या प्रकाराला आळा कां घालूं शकत नाहींत, याचें उत्तर बार्नेस यानें पुढीलप्रमाणें दिलेलें आहे...... पोलिस लोक या पेंढाऱ्याच्या पैशानें बांधलेले असतात. त्यांना दरमहा पगार चालू असतो. त्यांतूनहि एखादा अधिकारी कामाला लागलाच तर वरिष्ठ अधिकारी ताबडतोब त्याची बदली करतात किंवा बडतर्फ करतात.

......पूर्वीं दरोडा घातल्यावर पोलिसांनीं पकडलें म्हणजे मग दरोडेखोर वकिलाकडे जात. आतां सभ्य ' ठग ' पेंढाऱ्यांनीं, कायदेशीर सल्लागारांचीं मंडळेंच स्थापन केलेलीं आहेत. त्यांतील वकील, बॅरिस्टर, प्रॉसिक्यूटर यांच्या सल्ल्यानेंच किंवा रॅकेटची योजना सध्यां आंखली जाते......पक्षनिष्ठ राजकारण चालविण्यासाठीं ठग-पेंढाऱ्यांची सेना अत्यंत अवश्य असते. त्या बादशहांना दुखविलें तर निवडणुका हरतील हें राज-कारणी लोकांना पक्कें माहीत असतें. १९५० सालीं शिकागोच्या निवडणुकींत याच कारणामुळें डेमोक्रॅटिक पक्षाचा पराभव झाला तेव्हां राजकारणी लोक पुढील निवडणुकीवर नजर ठेवून या गुन्हेगार जगाला सांभाळण्यांतच गर्क असतात......तेथून तुम्ही न्यायालयाकडे जाल... त्याबद्दल बार्नेस म्हणतो कीं, " गव्हर्नर हे पूर्वींच्या कुठल्याहि पक्षांतलेच असतात. ज्याचें पूर्वचरित्र अगदीं निष्कलंक आहे, असा गव्हर्नर अमेरिकेंत दुर्मिळ आहे. सध्याच्या राजकीय पक्षाची यंत्रणाच अशी आहे कीं, तिचीं चाकें व तिचे आरे या ठगांनींच घडविलेले असतात. एका प्रख्यात गुन्हेगाराच्या अंत्ययात्रेला २१ न्यायाधीश, ९ वकील, अनेक स्थानिक आधिकारी उपस्थित राहिले होते."

गुन्हेगारीच्या वाढीची कारणमीमांसा करतांना बार्नेसनें कारणें दिलेलीं आहेत. कुटुंबसंस्थेची विघटना हें एक फार मोठें कारण आहे. 'कष्टाविना पैसा' ही वृत्ति त्यामुळें गेलीं शंभर वर्षें सारखीं पोसत आहे... अलिकडे तरुण स्त्री-पुरुषांत ही पापवृत्ति फार बळावत आहे. एकट्या न्यूयॉर्क शहरांत १५०

ते २०० लुटारू टोळ्या आहेत......कोडोपति भांडवलदार, साहसी सुरक्षित दरोडेखोर व राजकारणी नेते या त्रयीच्या धनलोभांतून, सत्ता-लोभांतून, नीतिभ्रष्टतेंतून ही गुन्हेगारी निर्माण झालेली आहे......नवी गुन्हेगारी मनोदौर्बल्य किंवा भूक यांतून निर्माण झालेली नाहींच. भांडवली समाजरचना आणि भ्रष्ट लोकशाही यांतून ही निर्माण झालेली आहे म्हणून ती नष्ट करावयाची असेल तर आपली अर्थव्यवस्था आणि आपली राज्यपद्धति यांचें स्वरूप आमूलाग्र बदललें पाहिजे... ...अमेरिकेंतील प्रतिष्ठित ठगपेंढारशाहीचा व येथल्या गुन्हेगारीचा तोंडावळा बराच सारखा आहे.

......आपल्याला माहीत आहे कीं, अमेरिकेंत वेड्या माणसांचें प्रमाण फार झपाट्यानें वाढत आहे. या पुढारशाहीमुळें अनेक ठिकाणीं समाजरचना उध्वस्त होत आहे. लोकांच्या मनावर निराशेचा, विफलतेचा पगडा बसत आहे आणि त्यामुळें १९५१ सालीं अमेरिकेंत १ लक्ष ७० हजार लोक वेडे वा मनोभ्रंश झालेले होते, व बार्नेसनें दिलेल्या माहिती-प्रमाणें ही संख्या शेंकडा ४० या प्रमाणांत वाढत आहे. आज जी पंधरा वर्षांचीं मुलें आहेत त्यांच्यांतून दर विसापैकीं १ वेडा होणार असें तज्ज्ञांचें मत आहे. अमेरिकेंतहि विवाहसंस्था भग्न होत आहे. दर तीन विवाहांपैकीं एकाचा विच्छेद होतो आणि पुढील १०-२० वर्षांत तें प्रमाण एकास एक होईल अशी समाजशास्त्रज्ञांना भीति आहे......सिफिलिस, गनोरिया अशा गुप्त रोगांचें प्रमाण अमेरिकेंत वाढतच आहे. कार्ल वॉरन या पंडिताच्या मतें अमेरिकेंत या रोगांनीं २ कोटी लोक ग्रस्त झाले आहेत. १९४० पासून हा रोग वाढतच आहे. या रोगांतील शें. ६० लोक १५ ते २५ या वयाचे असतात......अमेरिकेंत अफू, कोकेन व इतर मादक द्रव्यांवर १४०० कोटी रुपये दरसाल खर्च होतात. या व्यसनाबरोबर अमेरिकेंत आत्महत्येचें प्रमाण असेंच वाढत आहे......या सर्व आपत्तींना तोंड देण्यासाठीं अमेरिकन शास्त्रज्ञ कोणता उपाय सुचवितात ? चारित्र ! समाजांतील तरुणांना नीतीचें, चारित्र्याचें, उदात्त ध्येयवादाचें, मनोनिग्रहाचें शिक्षण दिलें पाहिजे. यालाच जुन्या काळीं धर्म असें म्हणत. वास्तविक मनोनिग्रह, त्याग, जनसेवा, ध्येयवाद, सत्यनिष्ठा, परमेश्वरावरील श्रद्धा, कुटुंबनीति हाच खरा धर्म होय. हा धर्म म्हणजे नव्या भाषेंत मूल्यें

अमेरिकेंतून नष्ट होत चाललीं आहेत. माणूस संयमी असला म्हणजे वरील अर्थानें धर्मनिष्ठ असला, त्याचीं नीतिमूल्यें दृढ असलीं तर हा अतिरेक होत नाहीं.

समाजांत कांहीं प्रमाणांत जरी अशीं निःस्पृह माणसें असलीं तरी ही आपत्ति टळते. इंग्लंडनें ही कितीतरी प्रमाणांत टाळली आहे. बार्नेसनेंच ही तुलना केली आहे. तो म्हणतो, कायदा पाळण्याची ब्रिटिश जनतेची वृत्ति प्रशंसनीय आहे. अमेरिकेच्या तुलनेनें सट्टेबाजीचा रोग ब्रिटनमध्यें फार कमी आहे......गेल्या २०० वर्षांत इंग्लंडमध्यें बँका गडगडल्याचें उदाहरण नाहीं. असलें तर अगदीं तुरळक......सट्टेबाजीचा हराम-पैशाचा मोह इंग्लंडमधील लोक जिंकू शकतात हा त्याचा अर्थ आहे... खेडेगांवांतील ग्रामपंचायतापासून प्रदेशांतील विधानसभेपर्यंत सर्वत्र दादांचें राज्य चालू आहे. राज्यकारभारांत तत्त्वनिष्ठेचा संबंध राहिला नसून कारस्थानी, पाताळयंत्री बळदंड माणसाचें राज्य तेथें आहे असा अर्थ होय......जनतेच्या पैशाचा अपहार करण्याच्या या वृत्तींतूनच पुढें गुंड-राज्य निर्माण होतें......स्वार्थी, हृदयशून्य, चारित्र्यहीन मनुष्य कोणत्याहि शासनपद्धतींतून, कोणत्याहि समाजरचनेंतून वाटेल ते अनर्थ घडवूं शकतो हें इतिहासांत पावलोपावलीं आपल्याला दिसून येत आहे... मानवाची नीति व चारित्र्य यांची पातळी वाढत नाहीं तोंपर्यंत राष्ट्रीयी-करण ही फारच मोठी आपत्ति आहे हें आपण कधींहि विसरूं नये.

– ४ –

[ 'साधना' २२-११-५८ (पृ. ५) : डॉ. अरविंद लोणकर ]

परदेशीं गेलेल्या प्रत्येकानें दुसऱ्या देशाची भरमसाट स्तुति करायची आणि आपल्या लोकांना आदेशाचे डोस पाजायचे अशी चाल आहे. अमेरिकेला आल्यावर तर हें कौतुक जास्तच करायला हवें. जगांतील इतर देशांहून येथें आल्यावर प्रत्येकाची मला अशीच वृत्ति दिसली. त्याचीं कारणें काय याचा विचार आतां मी करणार नाहीं, पण आहे ही स्थिति अशी——

म्हणूनच माझें हें पत्र वाचून तुम्हांला थोडेंफार आश्चर्य वाटेल. मी

नायगारा फॉल्सचें काव्यमय वर्णन करणार नाहीं कीं एंपायर स्टेटचें कौतुक सांगणार नाहीं. अमेरिकेंतील या विविध गोष्टींची आपल्याकडील सुशिक्षित माणसाला इतकी माहिती असते कीं, मी या विषयीं लिहिणें ही अनावश्यक द्विरुक्ति ठरेल. माझ्या वर्षा दीड वर्षाच्या वास्तव्यांत या देशाच्या लहानसहान गोष्टींबद्दल मला काय वाटेल तें मी लिहीन म्हणतों. हें सर्व वाचून तुम्हांला असें वाटेल कीं, मी अमेरिकेबद्दल फारच वाईट मत करून घेतलें आहे किंवा मी अगदीं भिकार समाजांतच वावरतों आहें, पण तशी स्थिति नाहीं ! या देशांत खूप चांगल्या गोष्टी आहेत हें मी सुखांतील मान्य करतों.

## कुटुंबावर जिवतीचा वरदहस्त

माझी अशी कल्पना होती कीं, अमेरिकन कुटुंबें अगदीं सुटसुटीत असतील. पण बघतों तर प्रत्येक कुटुंबावर जिवतीचा वरदहस्त दिसतो ! ५–६ मुलें म्हणजे अगदीं बेताचीं, अशी समजूत असते. गेल्या वीस वर्षांत मुलामुलींचें लग्नाचें वय कमी कमी होत आलेलें आहे. शाळेंत असतांनासुद्धां एखादें मूल पुष्कळदां दिसतें. बरें, या दोन मुलांमध्यें अंतर असावें तर पण नाहीं. एक पोर पोटांत, दुसरें अंगावर, एकदोन बाबागाडींत असें पुष्कळदां दिसतें. या देशांत कॅथॉलिक व इतर कांहीं पंथांना संततिनियमन मान्य नसल्यानें कुटुंबनियोजन कठीण होऊन बसलें आहे. त्यामुळें कुटुंबें फार मोठीं होत जातात.

पण इकडच्या बायकांना त्यांचें कौतुकच वाटतें. डोहाळे लागल्यापासूनच स्वतःचें कौतुक करून घेणें सुरू होतें. दुसरेहि त्याला हातभार लावतात. आपल्याकडे डोहाळे जेवण हा कार्यक्रम असतो. तसाच कांहींसा बेबी शॉवर या नांवाचा यांचा समारंभ असतो. मुलांच्या उपयोगी वस्तू, दुपटीं, बाटल्या, कपडे वगैरे वस्तू भेट म्हणून देण्याची पद्धत असते. बाळंतविडाच म्हणाना ! कित्येकदां शुभेच्छादर्शक कार्ड पण पाठवतात. मूल झाल्यावर ती बातमी आप्तेष्टांना कळविण्यासाठीं छान छान कार्ड्स् वापरतात. आपल्याकडेहि ती बातमी आप्तेष्टांना कळविण्यासाठीं छान छान कार्ड्स वापरतात. आपल्याकडे ही चाल प्रचारांत यायला हरकत नाहीं.

## मुलें बिघडण्याचा आरंभ

मुलें जसजशीं मोठीं होतात व दहा-बारा वर्षांचीं होतात तसतसा त्यांच्यांत अनिष्ट ( माझ्या दृष्टीनें ) बदल होत जातो. मला जर आश्चर्य वाटत असेल तर या गोष्टीचें. मलाच काय पण प्रत्यक्ष अमेरिकन लोकांनाहि या प्रश्नाचें उत्तर नि त्यावर उपाय सांपडलेला नाहीं. अमेरिकन मुलें म्हणजे आदर्श, मनापासून अभ्यास करणारीं, सायंकाळीं बेसबॉल, हॉकी वगैरे खेळ खेळणारीं, स्काऊटसारख्या संस्थांत जाऊन आयुष्यांत शिस्त लावून घेणारीं, तिकिटें, शंख शिंपले, कीटक प्राणी वगैरे जमवणारीं, एडिसनसारखे शास्त्रीय प्रयोग करणारीं वगैरे अशीं कांहींतरी असतील असें मला वाटत होतें. पण आजच्या मुलांना पुराण्या छंदांत गोडी नाहीं. शाळा सुटते कधीं व टेलिव्हिजनसमोर जाऊन बसतों कधीं असें बहुतेकांना होतें. कित्येकदां संध्याकाळीं ४ पासून रात्रीं ११ पर्यंत टेलिव्हिजनसमोरून मुलें हलत नाहींत. मुलांकरितां खास कार्यक्रम ६ वाजेपर्यंत, पण त्यानंतर खून, मारामाऱ्या, रहस्यकथा, अगर पाचकळ विनोदी कार्यक्रम रात्रीं ११ पर्यंत चालतात.

## टेलिव्हिजनचा नव्या पिढीला शाप

आतांच वर्तमानपत्रांत या कार्यक्रमाची आंकडेवारी आली आहे. ७ दिवसांत सकाळीं ९ ते रात्रीं ९ पर्यंतच्या कार्यक्रमांत २३२ खून पडले. क्रौर्य आणि निर्घृणता यांना अंत नाहीं हें फक्त एका स्टेशनवर !

टेलिव्हिजनचा परिणाम मुलांवर किती झाला आहे, याचें मोठें विनोदी प्रत्यंतर मला आलें. या कार्यक्रमांत नेहमीं खून होत असतात. एका कुटुंबांत सहज संभाषण चाललें होतें. मित्र म्हणाले, " हें पाहा डॉ. लोणकर, माझे आजोबा रेक्समध्यें वारले आणि मी न्यूयॉर्कला आलों ! " हें ऐकून त्यांचा ५-६ वर्षांचा मुलगा विचारतो, " बाबा त्यांचा खून कोणीं केला ? "

अमेरिकन जीवनांत टेलिव्हिजन हें वरदान नसून शाप आहे असें मला वाटतें. त्यावर कांहीं कार्यक्रम छान असतात हें मलाहि मान्य आहे. पण या चौकोनी पेटीनें अमेरिकन जीवनाची विधायक वृत्ति पार नाहींशी करून टाकली आहे......कित्येक घरांत टेलिव्हिजन कधींच बंद होत नाहीं. हा

कार्यक्रम खराब होता, पण पुढचा छान असेल अशा चक्रांत माणूस सांपडतो. संध्याकाळीं ५ वाजतां कामावरून आलेला माणूस रात्रीं ११॥ ला शेवटचा कार्यक्रम पाहून झोंपतो! कित्येकदां नवऱ्याला एक आवडतो तर बायकोला दुसराच म्हणून एकेका कुटुंबांत २ टेलिव्हिजन सेट्ससुद्धां कांहीं वेळां दिसतात.

## " रॉकरोल " चा ' भस्मासूर '

वयाच्या १०–१२ वर्षांपासूनच डेट ( Date ) या संस्थेला सुरुवात होते. तरुण मुलामुलींना एकमेकांच्या सहवासांत यायला मिळावें व त्यांचा परस्पर-परिचय वाढावा व आपापल्या आयुष्याचा साथी निवडायला संधि मिळावी असा या पद्धतीचा हेतु असावा. पण यांतून अनिष्ट गोष्टींच उत्पन्न होतात. मुलामुलींना एकत्र येण्याची अनेकदां संधि मिळून त्यांतून अनैतिक गोष्टी निर्माण होतात. गेल्या कांहीं वर्षांत अमेरिकेंत ' रॉकरोल ' डान्सला सुरुवात झाली आहे. हा प्रकार कुमारांत जास्त लोकप्रिय आहे. मला त्यांत कला तर कांहींच दिसत नाहीं, उलट तें हिडिस अंगविक्षेपाचें दर्शन वाटतें. पण अमेरिकेंतील तरुण मुलांच्या आयुष्यांत तें फारच महत्त्वाचें आहे! वयाच्या १२-१३ वर्षांपासून मुलें व मुली धूम्रपानाला सुरुवात करतात. आपल्याकडे हें व्यसन समजलें जातें.

......आजच्या अधिकृत आंकडेवारीप्रमाणें शें. ८० टक्के पुरुष व शें. २० टक्के स्त्रिया सर्रास धूम्रपान करतात. स्त्रियांचें प्रमाण फारच झपाट्यानें वाढत आहे. मी काम करतों, त्या ठिकाणीं सिगारेट न ओढणारी स्त्री शोधूनच काढावी लागते!

......अशा चाकोरीवरून घरंगळत असतांनाच कांहीं मुलें फार झपाट्यानें वाईट मार्गाला लागतात. बलात्कार, खून, डाके, लैंगिक गुन्हेगारी, लुटालूट वगैरे गुन्हे व्यक्तिशः तर करतातच पण अशा मुलांच्या टोळ्या जमवून होणारी संघटित गुन्हेगारी मला फारच भयानक वाटते. गंमत म्हणून एखाद्याला जाळून टाकला, करमणूक म्हणून पांचदहा घरांना आगी लावल्या, फांशी दिल्यावर कसें होतें हें बघण्यासाठीं कुणाला तरी टांगून दिला, एखाद्या सखीशीं भांडण झालें म्हणून तिला मरेपर्यंत बडविलें,

कुणाचा तरी राग आला म्हणून १०–११ लोकांनीं गोळी घालून ठार मारलें असे प्रकार या सुसंस्कृत देशांत होत असतील यावर विश्वास बसणार नाहीं. या प्रकाराला अमेरिकेंत 'जुव्हेनाईल डेलीव्हन्सी' म्हणतात. व सर्व समाजधुरीणांना ही मोठी डोकेदुखी आहे. न्यूयॉर्क, शिकागो वगैरे मोठ्या शहरांत तर पोलिसांना चक्क लढाईच करावी लागते. या लोकांशीं परवां तर न्यूयॉर्कसारख्या शहरांत आठ वर्षांच्या एका मुलानें विनाकारण आपल्या आईवडिलांना झोपेंत भोसकून ठार मारलें व चोरानें मारलें म्हणून पोलिसांना कळविलें !

......अमेरिकेंत माझी सर्वांत जर कशानें निराशा झाली असेल तर वर्तमानपत्रांनीं मला वाटलें होतें कीं, इतकीं आधुनिक साधनें असल्यानें येथील वर्तमानपत्रें कशीं छान असतील ! पण तीं बहुतेक जाहिरातींनीं भरलेलीं असतात. वाचण्याजोगा मजकूर जवळ जवळ शून्य; खून, आगी, अपघात, दरवडे याबाबत मनगटाएवढ्या ठळक 'अक्षरांत'! खरोखर महत्त्वाच्या बातम्या जवळ जवळ नाहींत. संपादकीय मजकूर अगदीं हीन दर्जाचा. पुण्यांत असतांना मी 'सकाळ'ला शिव्या घालीत असें. पण अमेरिकेंत आल्यावर मला त्याची किंमत समजली. न्यू टाइम्स व इतर ३–४ पत्रें मात्र याला अपवाद असून तीं फार उच्च दर्जाचीं आहेत.

......या देशांत लोक शिक्षित आहेत पण सुरक्षित आहेत असें मला वाटत नाहीं. गेलीं कांहीं वर्षें व्यावसायिक शिक्षणावर इतका अतिरिक्त भर दिला गेला आहे कीं, बुद्धिवादी शिक्षण पार दुर्लक्षित झालें. गणित, भाषा हे विषय शिकण्यापेक्षां सुतारकाम, संगीत किंवा मोटार ड्रायव्हिंग केव्हांहि सोपें. दोघांनाहि मान सारखाच. किंबहुना दुसऱ्या प्रकाराला आर्थिक महत्त्व जास्त......शाळा-कॉलेजांतून बाहेर पडलेल्या लोकांचा पुस्तकांशीं संबंध फार थोडा राहतो. सर्वसाधारण माणसाच्या घरांत टेलिव्हिजन, उत्तम फर्निचर, इतर सतराशें साठ आयुधें सांपडतील; पण त्याच घरांत पुस्तकांना जागा दिसेलच असें नाहीं. फार तर घराच्या सरावटीचा एक भाग म्हणून एखादी शोभेची पुस्तकांची अढमारी असेल.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थ
— ५ — अनुक्रम २८२१६ विः
क्रमांक ९३१३ नोंः दिः

[ भूदान यज्ञ, १८-७-५८ ]

मा. जयप्रकाशजी यूरोप वगैरे देशांच्या यात्रेवर आहेत. ते 'प्रिस्टन' या गांवीं जगद्विख्यात लेखक श्री. विल्फ्रेड वेलॉक यांना भेटण्यासाठीं गेलेले आहेत. त्यांच्या भेटींत जी कांहीं चर्चा झाली त्याचा सारांश त्यांचेबरोबर युरोपला गेलेले त्यांचे सहाध्यायी श्री. सिद्धराज ढड्ढा यांनीं 'भूदान यज्ञा'च्या दि. १८-७-५८ च्या अंकांत दिलेला आहे. या लेखांतील उतारे :—

"......परंतु श्री. वेलॉक यांना लढाईपेक्षांहि दुसरीच मोठी चिंता होती. ते म्हणाले : लढाईनें धन आणि लोक यांचीच फार हानि होते. परंतु भौतिक वस्तूंच्या मागें लागण्याच्या वेडानें लोकांमधील नैतिकता आणि आध्यात्मिकता खतम् करून टाकलेली आहे. बहुतेक लोक आज सत्त्वहीन आहेत. एखाद्या सामान्य संकटाशीं दोन हात करण्याची हिंमतहि ते आज गमावून बसलेले आहेत."

......सायंकाळीं जेवणानंतर आम्हीं सारे शेगडीभोंवतीं शेक घेत बसत होतों, आणि गप्पाहि मारीत होतों. मधून मधून जळलेले कोळसे इकडे तिकडे हलविले जात होते, ठिणग्या उडत होत्या. वेलॉकमहाशयांची वाग्धारहि मधून मधून पेट घेत होती. आणि त्यांच्या अंतःकरणांत जळणाऱ्या आगीची चमक दिसून येत होती. ते म्हणाले, "आज अमेरिका सर्वांत संपन्न देश मानला जातो. परंतु उच्चांत उच्च जीवनमानाच्या स्पर्धेत पडून आज तेथील बहुतेक लोक कर्जांत डुबलेले आहेत. घर, मोटार, रेडिओ सर्व वस्तू तेथें कर्जावर मिळतात. आणि पहिल्या वस्तूंचें कर्ज चुकवितां चुकवितां नव्या दहा वस्तूंचें कर्ज डोक्यावर बसतें. जाहिरातबाजी एवढ्या हद्दीला पोहोंचली आहे कीं, तिच्या जाळ्यांतून वांचणें मोठें मुष्किल झालें आहे. रेडिओ, टेलिव्हिजन वृत्तपत्रें व नियतकालिकें या चौमुखी हल्ल्यांशीं तोंड द्यायला तेथें सिंहाचीच छाती पाहिजे." आणि नंतर श्री. वेलॉक नवविवाहित

दांपत्याच्या दशेचें मोठ्या केविलवाण्या स्वरांत वर्णन करूं लागले. ते कशा-रीतीनें लग्न करतात. लग्न करतांच मोटार आणि घर कर्जावर खरेदी करतात. सुरुवातीला दोघें कांहीं ना कांहीं तरी काम करीत असतात. त्यामुळें कर्जाची किंमत विशेष वाटत नाहीं. नंतर मूल झालें म्हणजे पत्नीला नोकरी सोडावी लागते. आणि मग पुन्हां पति कर्जाच्या ओझ्याखालीं दबला जातो. खर्चहि वरचेवर वाढत असतो आणि मग बहुतेक या नवजवान मंडळींना आपल्या मुख्य नोकरीव्यतिरिक्त सकाळ, संध्याकाळीं काम शोधावें लागतें. मोठ्या प्रमाणावर कमींत कमी वेळेंत अधिकांत अधिक उत्पादन झाल्यामुळें जसजसें हें औद्योगीकरण वाढेल तसतसें मजुरांना मनोरंजनासाठीं फुरसद मिळेल असा या औद्योगिक संस्कृतीचा युक्तिवाद आहे. पण फुरसदीचा हा सिद्धान्त चुकीचा आहे. वस्तूचें उत्पादन वाढत असतांनाच जाहिरातबाजीमुळें लोकांची अस्वाभाविक, अनावश्यक आवश्यकताहि वाढत असते. आणि अशारीतीनें भोळेभाले लोक एका दुष्ट चक्रांत सांपडतात. फुरसदीच्या ऐवजीं अधिकांत अधिक मेहनत आणि कधींहि चुकत्या न होणाऱ्या कर्जाची चिंताच केवळ त्यांच्या पदरीं येते.

"पाश्चिमात्य लोक आतां या प्रकाराला कदाचित् रोखूं शकणार नाहींत. एखादें मोठें संकट आलें तरच यांतून ते निसटूं शकतील, परंतु मला अशी आशा आहे कीं, हिंदुस्थान आणि आशियामधील दुसरे कांहीं देश औद्योगी-करण आणि भौतिकवादाचा हा मार्ग स्वीकारणार नाहींत." वेलॉक म्हणाले !!! आणि कांहीं क्षणासाठीं त्यांची वाग्धारा थांबली. वेळ बराच झालेला होता म्हणून मीहि त्यांचा निरोप घेतला.

—बर्मिंगहॅम : २३–६–१९५८

– ६ –

[ 'स्त्री' **दिवाळी अंक १९५८ : सौ. वासंती गाडगीळ** ]

सौ. गाडगीळ अमेरिकेस गेलेल्या असतांना तेथील स्त्रियांच्या जीवनाचें व कौटुंबिक जीवनाचें वर्णन लेखिकेनें स्वानुभवानें या लेखांत केलेलें आहे.

......"अमेरिकन आईबाप मुलांशीं अधिक मोकळेपणानें व बरोबरीच्या नात्यानें वागतात. १२ ते २० वर्षांच्या मुलांना Teenagers म्हणतात. ह्या काळांतील मुलें ज्युनिअर हायस्कूल ते कॉलेजच्या पहिल्या दुसऱ्या वर्गांतील असतात. १२ वर्षांपासून मुलीला मुलाबरोबर बाहेर एकटें जाण्याची परवानगी देण्यांत येते. संध्याकाळीं मुलगा मुली बरोबर घेऊन फिरायला (अर्थात् मोटारींतून), नाचाला, सिनेमाला किंवा Teenagers club मध्यें जातो. त्याला डेटिंग म्हणतात. आई-बापांच्या संमतीनेंच मुलगी 'डेट' घेते. मुलामुलींनीं एकमेकांत मोकळेपणानें मिसळणें व एकमेकांना समजून घेणें ही 'डेट' मधील कल्पना. आपल्याकडे मुलामुलींना मोकळेपणानें मिसळण्याची संधीच मिळत नाहीं. आपली मुलगी अनेक मुलांबरोबर फिरलेली हिंदी आईबापांना आवडत नाहीं. पुष्कळ आईबाप मुलीला अमक्या वाजेपर्यंत घरीं आलें पाहिजे अशी ताकीद देतात.

.........पण या 'डेट' चें स्वरूप कांहीं वेळां फार विकृत होतें व त्यामुळें अमेरिकन जीवनांत बरेच गुंतागुंतीचे प्रश्न निर्माण झालेले आहेत. Teenagers Problems हा अमेरिकेंत फार मोठा सामाजिक प्रश्न आहे. मुलामुलींना दिलेल्या स्वातंत्र्याचा फायदा आपलें लैंगिक बाबतींतील औत्सुक्य पुरे करण्याकडे कित्येक वेळां करण्यांत येतो. अमेरिकन जीवनांत Sex ला वाजवीपेक्षां जास्त महत्त्व देण्यांत येतें. टेलिव्हिजन, सिनेमा, मासिकें व वर्तमानपत्रें Sex ला जास्त महत्त्व देऊन मुलांचें औत्सुक्य जागृत करतात, असाहि आरोप केला जातो. मुलींच्या कांहींशा स्वैर वागणुकीकडे, नटण्यामुरडण्याकडे व रात्रीं उशिरां घरीं येण्याकडे आईबाप कित्येक वेळां दुर्लक्ष करतात. कारण आपण जर मुलीवर बंधनें घातलीं तर मुलीला 'डेट' मिळणार नाहींत व तिचें लग्न जमण्याची शक्यता कमी होईल असें त्यांना वाटतें. याचा परिणाम अनेक वेळां विवाहपूर्व गर्भसंभव, गर्भपात व धाकाचीं लग्नबंधनें Forced Marriages यांत होतो. वरील धोके टाळण्याकरितां आईबापांना आपल्या मुलीनें एकाच मुलाबरोबर स्टेडी जाणें आवडत नाहीं.

अमेरिकेंत मुलामुलींचें लग्नाचें वय कमी होत आहे व आपल्याकडे मात्र तें वाढत आहे. १६ ते १८ वर्षांच्या विवाहित मुली अनेक दिसतात. २०

वर्षाच्या मुलाला दोन मुलें झालीं तर त्याचें कोणी आश्चर्य मानीत नाहीं. विवाहाचें वय कमी होण्याला आर्थिक कारणहि आहे. इथें नोकरी मिळणें सहज शक्य असतें. कित्येकदां लग्न करून मुलगा शिक्षण सोडून नोकरी करतो व कित्येकदां मुलगी नोकरी धरते व मुलगा आपलें शिक्षण चालू ठेवतो. विद्यार्थ्याच्या बायकोलाहि Putting husband through ही पदवी गंमतीनें देण्यांत येते. सगळ्या युनिव्हर्सिटीतर्फे विद्यार्थ्यांकरितां गाळे बांधलेले असतात. पुरेशी मानसिक वाढ न झाल्यानें जन्माचा सोबती निवडतांना चुकाहि होतात. लग्नानंतर अनेक प्रश्नांना तोंड देणें कोवळ्या जोडप्यांना कठीण जातें. नवरा-बायकोंनीं एकमेकाशीं जुळवून घेण्याला जो एक समजूतदारपणा लागतो तो नसल्यानें त्याचें पर्यवसान घटस्फोटांत होतें.

शाळा–कॉलेजांतील मुलांत कित्येकदां Run away लग्नें होतात. अमेरिकेंतील कांहीं संस्थानांत कुठल्याहि J. P. कडे जाऊन ५ मिनिटांत लग्न करतां येतें. मुलगा किंवा मुलगी जर सज्ञान नसेल तर कित्येकदां आई-बाप लग्न बेकायदेशीर ठरवितात.

......मुलें मोठीं होऊन आपापल्या मार्गानें जातात व त्यांचे आई-बापांशीं संबंध फार थोडे राहतात. पुष्कळ मुलें आई–बापांना वर्षांतून एकदां तरी 'भेटण्याचा' प्रयत्न करतात. मुलांना आई–बापाकडून व आई-बापांना मुलांकडून मदत घेणें कमीपणाचें वाटतें. वृद्ध माणसें एकटींच राहतांना आढळतात. म्हातारपणाची आर्थिक दृष्टया तरतूद तर बहुधा सर्वच लोक करतात. मुलांवर कोणीच अवलंबून नसतें. आपल्या हातानें कांहीं होईनासें झालें कीं, तीं वृद्धाश्रमांत राहतात. तिथें नर्सेस त्यांची काळजी घेतात. वृद्धपणांत मुलांकडे राहण्यापेक्षां रेस्ट होममध्यें राहणें ते जास्त पसंत करतात. सामाजिक चालीरीतीप्रमाणें मुलांनीं म्हाताऱ्या आईबापाकडे दुर्लक्ष केलें असें कोणी मानीत नाहीं. प्रत्येकजण आपल्या वृद्धापकाळाची नव्हे तर आपल्या अंत्यसंस्कारास येथें फार खर्च येतो त्याचा बोजा आपल्या मुलावर पडू नये अशी त्यांची इच्छा असते.

— ७ —

अमेरिकन बालगुन्हेगार कोर्टाचा न्यायाधीश न्या. लींडसे ' The Revolt of Modern Youth ' या पुस्तकांत म्हणतो :

" I have at hand certain figures which indicate with certainty that for every case of sex delinquency discovered, a very large number completely escape detection. For instance out of 495 girls of high school age—though not all of them were in high school,—who admitted to me that they had had sex experiences with boys, only about 25 become pregnant. That is about 5 per cent, a ratio of one in twenty. The others avoided pregnancy, some by luck, others because they had a knowledge of more or less effective contraceptive methods—a knowledge by the way which I find to be more common among them than is generally supposed........The estimated percentages, as to the number of boys in high school who have probably had sex experience ranges from thirty to ninety per cent......I made a somewhat similar investigation of another high school. I personally talked to about one hundred of these boys. Over half of them admitted to me porsonally and of course confidentially that they had had sex relations with women, mostly on Market Street. ......But I am obliged in honesty to say that homes in which children can find the right spiritual and intellectual atmosphere are exception rather than the rule.

......There are at least 50,000 girls in New York living with men who are not their husbands......It is the marriage muddle, combined with the deliberately fostered ignorance about birth control that is responsible for probably at least a million and half abortions performed in this country every year a millon and a half living though unborn children deprived of the right of birth because the mothers didn't know how to prevent life from starting and because our

conventional notions above love as a thing necessarily identical with legal marriage cast a needlessly cruel stigma on motherhood out of wed lock.

वाचकहो, अमेरिकेच्या कुटुंबसंस्थेचें व विवाहसंस्थेचें हें असें चित्र आहे. तेथील अनुभवानें आपण योग्य तो धडा जर घेतला नाहीं तर इतिहास आपणांस मूर्खांत काढल्याखेरीज राहणार नाहीं. म्हणून याबाबत आपण योग्य तो विचार करण्याचा निर्णय आजच घेऊं या !

# आमचें आजचें जीवन आणि चारित्र्य : ६

भारतानें उद्योगधंदे, कारखाने, धरणें, कालवे इत्यादि क्षेत्रांत फार मोठी स्पृहणीय व विलोभनीय कामगिरी केली आहे यांत तिळमात्र शंका नाहीं. उद्योगधंद्यांची वाढ, उत्पादनवाढ इत्यादि बाबतींत आपण उच्चांक मिळवूं लागलों आहोंत आणि आतां आर्थिक समृद्धिपण झाल्यामुळें पिढ्यान् पिढ्या अठरा विश्वें दारिद्र्यांत पिचणाऱ्या भारतीयाला यापुढें अधिकाधिक भौतिक सुख लाभेल यांत तिळमात्र शंका नाहीं.

परंतु हें सर्व असतांना आपल्या दैनंदिन जीवनांत, राजकीय जीवनांत—सारांश सर्व क्षेत्रांत आपली नीति वाढली असें आपण छातीठोकपणें म्हणूं शकूं का? माणसाला माणूस म्हणून वागविण्याचा साधा प्रमाणभूत पण महत्त्वाचा संस्कार आपल्या जीवनांत आलेला आहे, असें आपण अभिमानानें म्हणूं शकूं का? आमच्या देशांत निरक्षरता कमी झाली हें कबूल, पण आमचे संस्कार वाढले का? हीच खरी आजच्या युगाची समस्या आहे असें मला वाटतें. आमची नीतिमत्ता वाढली कीं नाहीं हें पडताळून पहावयाचें आहे ना? मग गेल्या सहा महिन्यांतील वर्तमानपत्रांतील बातम्या आपण चाळून पाहूंया. पहा बरें! आपणांस समाधान लाभतें का? निराशेचे सुस्कारे सोडावेसे वाटतात!

(१) डॉ....यांनीं पैशासाठीं एका श्रीमंत विधवेचा खून केला त्याबद्दल त्यांना फांशीची शिक्षा देण्यांत आली.

(२) डॉ....यांनीं पैशासाठीं स्वतःच्या तरुण पत्नीचा मोठ्या रकमेचा विमा उतरविला व तिचा विषप्रयोगानें खून केला या आरोपावरून अटक.

(३) डॉ....यांनीं स्वतःच्या सुनेस जाळून मारलेल्या आरोपावरून त्यांच्यावर खटला भरण्यांत आला.

(४) एका इंजिनिअरनें परदेशपर्यटनाच्या महत्त्वाकांक्षेनें स्वतःच्या पत्नीचा खून केला व दुसरा श्रीमंत सासरा शोधीत होता. त्या श्रीमंत सासऱ्याकडून मिळणाऱ्या हुंड्यावर तो परदेशीं जाणार होता व दुसरें लग्न करण्याचा प्रसंग निर्माण करण्यासाठीं त्यानें पत्नीचा खून केला म्हणून जन्मठेपेची शिक्षा.

(५) गांवच्या वकिलांनीं मॅजिस्ट्रेटची खोटी सही करून मॅजिस्ट्रेटची ऑर्डर झाल्याची बतावणी केली म्हणून खटला भरण्यांत आला व त्यांना शिक्षा ठोकण्यांत आली.

(६) ××× येथील म्यु. तील आरोग्यखात्यांतील इन्स्पेक्टर यांनीं बनावट औषधें तयार करून तीं केमिस्टमार्फत विकलीं म्हणून अटक केली. चौकशी चालू आहे.

(७) नवी दिल्ली येथील कोर्टांत पतियाळाचे एक ॲडव्होकेट व मॅजिस्ट्रेट या दोघांवर दोन स्त्रियांवर बलात्कार केल्यामुळें खटला चालू आहे. त्या स्त्रियांनीं कोर्टांत अशी तक्रार केली कीं, या वकील व मॅजिस्ट्रेटसाहेबांनीं माझ्यावर बलात्कार केला. एकदां तर मॅजिस्ट्रेटसाहेबांनीं मोटार चालू असतांना बलात्कार केला.

(८) भाक्रा-नानगलवरील १८ इंजिनिअर्सना त्यांच्या ताब्यांत दिलेली सिमेंट, लोखंडी सामान, चुना इत्यादि सामग्री धरणकामांत वापरण्याऐवजीं काळ्याबाजारांत विकली म्हणून अटक केली.

(९) एका ख्यातनाम (!) उच्च, शिक्षित, परदेशपर्यटन करून आलेल्या डॉ.........यांनीं रजिस्टरमधील नोंदी फाडून पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केला म्हणून कोर्टानें त्यांच्यावर खटला कां भरूं नये ? अशा आशयाची नोटीस बजावली आहे. इत्यादि.

अशा स्वरूपाच्या बातम्या कशाच्या द्योतक आहेत ? भारताच्या नीतिमत्तेचा पारा वर चढल्याच्या का खालीं उतरल्याच्या द्योतक आहेत ? आणि ही फक्त 'सुशिक्षित गुन्हेगारी 'च ( White collar crime) वर नमूद केली. दारूबंदी

अथवा इतर कायद्यामुळें गुंडगिरी, मवालीपणा व नैतिक अध:पात आपणांस समाजाच्या सर्व क्षेत्रांत प्रामुख्यानें दिसत आहेत. तें भारताच्या उत्कर्षास निश्चतपणें खीळ घालील यांत मला तिळमात्र शंका नाहीं. कांहीं महिन्यां-पूर्वीं बातमी अशी होती कीं, "विंध्य प्रदेशांतील माजी शिक्षणमंत्र्यांनीं ६० लाखांची अफरातफर केली." सदरचे मंत्रिमहाशय संन्याशाचा वेष घेऊन हातांत जपमाला घेऊन एका देवळांत बसलेले होते. त्यांच्या मुलांनीं मात्र त्यांचे पिता वारल्याचें 'ॲफिडेव्हिट' कोर्टांत दिलेलें होतें. त्यांना अटक करून खटला भरण्यांत आला आहे. असले शिक्षणमंत्री मुलांचें चारित्र्य काय घडविणार ? अशा या शिक्षणमंत्र्यानें पूर्वीं नितिमत्तेचे धडे व भरपूर लंबीचवडीं व्याख्यानें ते मंत्री असतांना प्रांतभर दिलेलीं असतील ! पण कुंपणच शेत खाऊं लागलें. सारांश, सरस्वतीच्या पवित्र दालनापासून तों न्यायदेवतेच्या परमोच्च मंदिरापर्यंत भ्रष्टाकार, अनीति, वशिलेबाजी व लांचलुचपत दिसून येते व माझे मतें भारताला हें एक फार मोठें संकट आहे. भारताला धान्य बाहेरून आणावें लागतें. म्हणून अन्नधान्याचें उत्पादन वाढवावें हा महत्त्वाचा प्रश्न आहे असें म्हणतात व तें खरेंहि आहे. शिवाय औद्योगिक उत्पादन वाढणें हेंहि जरूरीचें आहे व तोहि तितकाच महत्त्वाचा प्रश्न आहे, यांत तिळमात्र शंका नाहीं. परंतु या सर्वांपेक्षांहि अत्यंत महत्त्वाचा असा जर कोणता प्रश्न असेल तर तो चारित्र्य घडवि-ण्याचा होय. उपराष्ट्रपति डॉ. राधाकृष्णन्‌हि म्हणतात, 'There is a crisis of national character' राष्ट्रांतील–सर्व क्षेत्रांतील सर्व नागरिकांचें चारित्र्य घडविणें हाच खरा व मोठा प्रश्न आहे व या महत्त्वाच्या प्रश्नाकडे सर्व पुढाऱ्यांनीं व धर्मपंडितांनीं संपूर्णपणें लक्ष घालून चारित्र्य घडविण्याचे जर सर्वांनीं यत्न केले नाहींत तर आपला तरणोपाय नाहीं. विद्यार्थी आणि व्यापारी, वकील व डॉक्टर, पुढारी व अनुयायी, सरकारी अधिकारी व शिक्षक, मजूर व शेतकरी या सर्व प्रकारच्या सर्व नागरिकांचें चारित्र्य घडविण्यासाठीं सर्वांनीं भगिरथ प्रयत्न करणें अत्यावश्यक आहे. त्याप्रीत्यर्थ कांहीं मोठ्या पुढाऱ्यांनीं मंत्रिपदें सोडून देऊन या कार्यास वाहून घेणें अत्यावश्यक आहे असेंहि मला पुष्कळ वेळां वाटतें.

## या अधःपतनाचें मूळ कशांत आहे ?

या अधःपतनाचें आपणांस जर मूळ शोधतां आलें तर त्याचा उपायहि आपणांस सांपडेल. म्हणून या सर्वांचें मूळ कशांत आहे याचा अभ्यास करणें अत्यावश्यक आहे. म्हणून मूळ प्रश्न असा कीं, या सर्व गोष्टी होतात तरी कशामुळें ? मूळ एकच कीं, आज आपण पैसा व सत्ता यांनाच जीवनांत फार मोठें स्थान देतों. कांहीं वेळां तर चरित्र, विनय व नीतिमत्ता ही उघड उघड द्यावयाची शिवी झालेली आहे ! चारित्र्य नसेल त्या माणसाजवळ अमाप धन अथवा अमर्याद सत्ता असली तर समाजांत त्याला भरपूर प्रतिष्ठा मिळते. मग तो मनुष्य गुंडांचा राजा असला तरी चालेल त्या मनुष्याला समाजांत मानमरातब भरपूर मिळतो. याचे उलट चारित्र्यवान् पण निर्धन माणसाची वाहवा जेमतेम बेताचीच होते. त्यामुळें सर्वसाधारण व्यक्तींना असें वाटतें कीं, "करायचें काय तत्त्व—अन् करायची काय नीतिमत्ता ? येन केन प्रकारेण आपण लक्षाधीश झालों म्हणजे झालें !" त्यामुळें आज आपणांपुढें नीतिमान् माणसांचे आदर्श नाहींत तर येन केन प्रकारेण लक्षाधीश होणाऱ्या माणसाचे आदर्शच आपल्यापुढें आहेत. सर्वसाधारणरीत्या चारित्र्याची किंमत कमी कमी होत चालली आहे. एकमेकांच्या उखाळ्या-पाखाळ्या काढणें आपणांस फार फार आवडूं लागलेलें आहे—इतकें कीं भरपूर, जाहीरपणें शिव्या देणारीं, हीन वृत्तीचीं वृत्तपत्रेंच फार फार लोकप्रिय होऊं लागलेलीं आहेत. व तीं वृत्तपत्रें तथाकथित शिकलेल्या माणसांनाहि फार फार आवडूं लागलेलीं आहेत. भौतिक सुखाचीं साधनें आपण वाढविलीं हें खरें; पण भौतिक सुखें म्हणजेच परमसुख अशाप्रकारचा आभास आपण स्वतःभोंवतीं निर्माण केला आहे. आपली आजची संस्कृति भौतिक सुखाच्या मुळ्याभोंवतीं आपण गुरफटून घेतली आहे. म्हणून चारित्र्य व नीतिमत्ता गेली तरी चालेल, पण मला भौतिक सुख जास्तींत जास्त मिळावयास हवें, अशाप्रकारची मनोवृत्ति समाजांतील सर्व थरांच्या लोकांची झालेली आहे. शिक्षकांपासून मजुरांपर्यंत, भांडवलदारांपासून सरकारी नोकरांपर्यंत सर्वांना असें वाटतें कीं, प्रत्यक्ष कार्य कसेंहि होवो—बरें होवो किंवा वाईट होवो—राष्ट्राचा फायदा वा नुकसान

होवो परंतु प्रत्येकाला हल्लीं झटपट, कष्ट न करतां लक्षाधीश होण्याची महत्त्वाकांक्षा लागलेली आहे. डाके घालून का होईना—खून करून का होईना—बंगला बांधून मोटार ठेवणें हेंच ध्येय जणूं कांहीं आमच्यापुढें ठेवलें गेलें आहे असें वाटतें ! आणि अशाप्रकारें भौतिक सुखाच्या मागें सारखें धांवत गेल्यानें समाजांतील व राष्ट्रांतील नीतिमत्ता खालावलेली आपणांस दिसत आहे.

मग साहजिकचपणें असा प्रश्न उभा राहतो कीं, यावर उपाय काय ? या सर्वांवर उपाययोजना करतांना पुढील पिढीवर आदर्श व उत्कृष्ट असे संस्कार अंगीं येण्याकरितां धार्मिक शिक्षण सक्तीचें करणें अत्यावश्यक झालें आहे. अर्थात् धार्मिक शिक्षण याचा अर्थ क्रियाकांडाचें शिक्षण नव्हे तर आदर्श अशा धार्मिक तत्त्वाचें शिक्षण मुलांना लहान वयांत देणें ही अत्यंत महत्त्वाची बाब आहे. लहान आणि कोंवळ्या वयांत मुलांच्या मनावर जर चांगले संस्कार देऊं शकलों तर ती पिढी मोठेपणीं निश्चितपणें नीतिमत्तेनें वागतांना आपणांस दिसेल. जुन्या पिढींतील जे जे थोर चारित्र्यवान् पुढारी भारताला लाभले, त्यांना त्यांच्या पालकांनीं धार्मिक शिक्षण लहानपणीं दिलेलें होतें ! व अशाप्रकारें कोवळ्या वयांतच धर्माचे उत्कृष्ट संस्कार मनावर बिंबविल्यानें मोठेपणीं त्यांनीं चारित्र्यमय जीवन घालविलें म्हणून ही एक फार मोठी व महत्त्वाची गोष्ट आपण लक्षांत घेतली पाहिजे.

दुसरी महत्त्वाची गोष्ट अशी कीं, आज राष्ट्रांत हीन मनोवृत्तीचें प्रदर्शन करणारे शेंकडो बोलपट व वाङ्मय यांचा प्रसार फार मोठ्या प्रमाणावर होत आहे. त्याला वेळींच आळा घालणें हें सरकारचें आद्य कर्तव्य आहे. कारण अशा प्रकारच्या बोलपटामुळें व वाङ्मयामुळेंच समाजांतील वातावरण जास्तींत जास्त बिघडत जातें. चोऱ्यामाऱ्या करणारे बोलपटांतील नायक, उत्तान व बीभत्स शृंगारानें परिपूर्ण असें अश्लील व ढोलक्याच्या पार्श्वभूमीवर आधारलेलें चित्रविचित्र पोषाख घालून नृत्य करणारे नट व नटी यांनीं समाजापुढें इतके घाणेरडे आदर्श ठेवलेले आहेत कीं, ते ज्या दिवशीं कायद्यानें बंद होतील तो सुदिनच समजावयास पाहिजे.

तिसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे अशी कीं, आज आपण समाजांत चारित्र्य

व नीति यांचीच पूजा करण्यास शिकलें पाहिजे. 'चारित्र्यहीन मनुष्य मग तो लक्षाधीश अथवा सत्ताधीश असो, अशा माणसाला समाजांत यःकश्चित् आदर मिळत नाहीं,' अशाप्रकारचें वातावरण आपण निर्माण करावयास हवें! तरच समाजांत जास्तींत जास्त चारित्र्यवान् माणसें निर्माण होऊं शकतील आणि हें सर्व करण्यासाठीं देशांतील वजनदार व प्रभावी पुढाऱ्यांनीं, राजकारण व राज्यकारभार तूर्त बाजूला सारून देशांत सर्वत्र संचार करून आजची राष्ट्राची खरी नाडी व गरज ओळखून समाज व राष्ट्रापुढें आदर्श निर्माण करावयाचा भगिरथ प्रयत्न करावा.

शिवाय आजच्या आपल्या धर्मोपदेशकांनीं धर्माची शिकवण देतांना क्रिया म्हणजेच धर्म अशा प्रकारची एकांगी शिकवण न देतां दैनंदिन जीवनांत धर्म कसा येईल, आपलें चारित्र्य निर्मळ कसें होईल, याचाच उपदेश देणें आवश्यक आहे. आमचे एक परममित्र पंढरपूरला गेले होते. तेथील मंदिरांतील पिढीजात काम करणाऱ्या बडव्यांना एक किमती अगरबत्ती देवळांत पेटविण्यास दिली. त्यांनीं देवाच्या नांवावर मिळालेली अगरबत्ती स्वतःच्या घरीं नेली. पुढें माझ्या त्या मित्रांना हें कळाल्यावर त्यांनीं त्याचे घरीं जाऊन ती अगरबत्ती 'जप्त' केली व धर्माच्या नांवावर चाललेल्या 'चोरीचा' यथायोग्य शब्दांत त्या देवाच्या उपासका (!) चा समाचार घेतला. व अशा प्रकारची परमेश्वराची भक्ति (!) न करण्याची विनंति केली. क्रियेंतच धर्म आहे हें मानणाऱ्या लोकांसाठीं ही घडलेली सत्यकथा मी मुद्दाम येथें नमूद करीत आहें.

सारांश, समाजावर व राष्ट्रांवर ज्या ज्या व्यक्तींची—मग ती व्यक्ति पुढारी असो किंवा धर्मोपदेशक असो—अशा सर्व व्यक्तींनीं समाजांतील सर्व थरांत मिसळावें व याबाबत योग्य तो यत्न करावा. देशावर परचक्र आल्यावर ज्याप्रमाणें महान् संकट समजून देशांतील सर्व नागरीक स्वातंत्र्य टिकविण्यासाठीं स्वतःचे प्राणदेखील पणास लावतात, त्याप्रमाणें आज आपल्या राष्ट्राचें हें एक महान् संकट समजून नीतिमत्ता वाढविण्याचा सर्वतोपरी प्रयत्न आपण करणें हीच आजच्या कालांतील आपल्या राष्ट्राची व समाजाची खरी भूक आहे व हीच खरी देशभक्ति व धर्मभक्ति हें समजून या कार्यास आपण सर्वजण त्वरेनें लागूंया!

# धर्म आणि विज्ञान : ७

## विज्ञानाची आकर्षक वाटचाल

विज्ञानानें मानवी जीवनाच्या सर्व क्षेत्रांत विलक्षण प्रगति केलेली आहे. वेगवेगळ्या प्रकारचीं साधनें निर्माण झाल्यानें मानवी जीवनांत त्यानें अमाप सुख निर्माण केलें आहे यांत तिळमात्र शंका नाहीं. 'संत तुकाराम महाराज विमानांत बसून वैकुंठास गेले' ही त्या काळांत अशक्य गोष्ट वाटत होती. परंतु आज विमानांतील प्रवास हा लहान मुलासहि आश्चर्याचे धक्के देणें तर दूरच राहो पण त्यांत नाविन्यताहि दर्शवीत नाहीं. कांहीं अंशीं निसर्गाला अक्षरशः शरण आणण्यांत मानवाला सुयश प्राप्त झालेलें आहे, असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. अणु व परमाणु हे आतां मानवाचे दास झालेले आहेत. रेडिओ, टेलिफोन, स्कूटर, मोटार, मोटारसायकल, पंखे आणि विजेचे दिवे इत्यादि वस्तूंचा सुखोपभोग पूर्वीच्या काळीं अत्यंत श्रीमंत किंवा लक्षाधीश माणसालाच शक्य होता. परंतु आतां सर्वसामान्य मनुष्यहि हें सुख भोगू शकतो. अमाप धनाची आतां हें सुख अनुभविण्यास जरूरी नाहीं. ट्रॅक्टरसारख्या यंत्रसामुग्रीनें भरतभूमि अक्षरशः 'सुजलाम् सुफलाम्' होणें शक्य झालेलें आहे. इंजिनियर्सच्या कुशलतेनें व बुद्धीनें मोठमोठ्या धरणाच्या योजना या आतां फक्त कागदावरीलच योजना न राहतां, प्रत्यक्ष संपूर्ण झालेलीं धरणें व कालवे आपणांस पाहण्यास मिळत आहेत. व अशा प्रकारच्या योजनांमुळें वर्षानुवर्ष नापिक म्हणून पडून राहिलेली भूमाता आतां आपणांस प्रसन्न होऊन ती वरदहस्तानें मानवाला अन्नधान्यें व इतर सर्व प्रकारचीं पिकें दान करीत असून आपला अन्नधान्याचा प्रश्न सोडविण्याला मदत करीत आहे. शिवाय चंद्रावर जाणें किंवा मंगळावर जाणें ही बाब आतां काव्य राहिली नसून मानवाच्या कक्षेंतील ही बाब झालेली आहे.

अशा रीतीनें विज्ञानानें मानवाच्या सर्व क्षेत्रांत विलक्षण झटका दिलेला आहे. कांहीं वेळां कांहीं क्षेत्रांत तर विज्ञानानें स्फोटच उडवून दिलेला आहे. त्यामुळें त्या क्षेत्रांत प्रचंड धरणीकंप झालेला आहे. आणि अशीं जीं क्षेत्रें आहेत त्यांपैकीं धर्माच्या क्षेत्रांतहि विज्ञानानें प्रचंड असा ॲटमबाँब टाकलेला आहे. म्हणूनच आजच्या अणू व परमाणूच्या विसाव्या शतकांत धर्माचें स्थान काय आहे, व विज्ञानयुगांत धर्माचें कार्य काय असा प्रश्न निर्माण झालेला आहे. जुन्या काळांतील मूल्यें बदललीं व बदलत चाललीं आहेत. अशावेळीं जी नवीन समाजरचना आपणांस निर्माण करावयाची आहे त्या समाजरचनेंत धर्माचें अधिष्ठान काय असावें याचाहि विचार होणें अत्यंत आवश्यक आहे. म्हणून या विषयाचा आपण विचार करूं.

## धर्म म्हणजे काय ?

म्हणूनच हें विवेचन करतांना महत्त्वाचा प्रश्न असा निर्माण होतो कीं, धर्माची व्याख्या काय ? धर्माची व्याख्या सर्वसाधारणरीत्या

"धारणाद् धर्म इत्याहुः । धर्मो धारयते प्रजाः"

अशी केलेली आहे. म्हणजे समाजाची धारणा ज्या मूलभूत तत्त्वामुळें होते, त्या तत्त्वांना धर्म म्हणतां येईल. ज्या तत्त्वांमुळें समाजाचें पोषण होतें, समाज टिकून राहतो त्याला आपणांस धर्म म्हणतां येईल. कै. न. चिं. केळकरांनींहि धर्माची व्याख्या खालीलप्रमाणें केलेली आहे :

"समाजांतील निरनिराळ्या वर्गांचे हक्क व कर्तव्यें यांचा समन्वय व धारणा करणारी जी व्यवस्था आहे तिला धर्म म्हणतात." महाभारतकारांनीं नीतिमत्तेचें हेंच तत्त्व मांडलेलें आहे व 'तत्परस्य संदध्यात् प्रतिकूलं यदात्मनः ।' म्हणजे ज्या वागणुकीनें आपणांस सुख होईल त्याच वागणुकीनें इतरांस सुख होईल आणि ज्या कृत्यामुळें आपणांस दुःख होईल त्याच कृत्यामुळें इतरांस दुःख होईल, अशी जाणीव प्रत्येकानें मनाशीं ठेवावी. आणि हाच नीतिमत्तेचा पाया होय. आमच्या जैन सूत्रांतहि अशाच प्रकारचा उल्लेख सांपडतो. परमेश्वराला प्रार्थना करतांना 'सर्वांचीं दुःखें दूर होवोत व सर्वांना शांतता लाभो' अशा प्रकारची प्रार्थना जैनांची आहे. जैन त्यांच्या प्रार्थनेंत म्हणतात.

"ओम् पुत्र-मित्र-भ्रातृ-कलत्र सुदृह्-स्वजन-संबंधि बंधु-वर्ग सहित: नित्यं चामोद प्रमोद कारिण: अस्मिंश्च भूमंडलायतन्-निवासि-साधु साध्वी श्रावक-श्राविणाकारीमोपसर्ग-व्याधि-दु:ख-दुर्भिक्ष दौर्मनस्योपशमनाय शान्तिर्भवतु ॥"

फक्त माझेंच भलें होवो, मीच सुखांत राहो अशा प्रकारची प्रवृत्ति जर समाजांतील सर्व थरांच्या व्यक्तींच्या अंगांत राहिली तर समाज टिकूंच शकणार नाहीं. म्हणून ज्या मुलभूत सिद्धांतामुळें किंवा तत्त्वामुळें समाजाचें धारण व पोषण होतें त्या मूलभूत तत्त्वांना आपणांस धर्म म्हणतां येईल.

अशा तऱ्हेनें धर्माची व्याख्या केल्यानंतर धर्मानें पूर्वींच्या समाजांत कोणकोणतें कार्य केलें हें पाहूं म्हणजे हल्लींच्या युगांत धर्माचें स्थान काय राहील याचें विवेचन करण्यास ठीक पडेल. भूतकालांत धर्मानें मानवमात्राची सर्वप्रकारच्या क्षेत्रांत म्हणजे राजकीय, वैद्यकीय, सामाजिक, नैतिक इत्यादि कार्यें केलेलीं आहेत व त्यामुळेंच मानवसंस्कृतीचा विकास झालेला आहे. राजकीय, वैद्यकीय, सामाजिक व नैतिक इत्यादि सर्व क्षेत्रांतील नियम पूर्वींच्या ऋषीमहर्षींनीं आंखून दिलेले होते. त्यामुळेंच कोणत्याहि क्षेत्रांत धर्माचा आधार घेणें अटळ होतें. आतां राजकीय, वैद्यकीय व आर्थिक इत्यादि क्षेत्रें धर्माच्या कक्षेच्या बाहेर गेलेलीं असून त्यांची जागा विज्ञानानें घेतलेली आहे. या सर्व वेगवेगळ्या क्षेत्रांतील कार्य आतां विज्ञानानें आपल्या हातांत घेतलें आहे. प्रत्येक क्षेत्रांत चिकित्सा करून, बुद्धीच्या निकषावर घासून पुसून, विज्ञानानें कांहीं मूलभूत सिद्धान्त प्रस्थापित केलेले आहेत. व त्या क्षेत्रांत पूर्वीप्रमाणें धर्मानें करण्यासारखें विज्ञानयुगांत फारसें कार्य राहिलेलें नाहीं. ही वस्तुस्थिति आहे. या सर्व क्षेत्रांत पूर्वींच्या कालांत धर्मानें कार्य केलें; परंतु राजकीय, आर्थिक, वैद्यकीय इत्यादि विषयांत आतां धर्मानें करण्यासारखें फारसें कार्य नाहीं.

## विज्ञानयुगांतील धर्माचें कार्य

मग साहजिकपणेंच प्रश्न असा कीं, विज्ञानयुगांतील धर्माचें कार्य काय ? वर म्हटल्याप्रमाणें समाज सुस्थितींत राहावयाचा असेल तर धर्म किंवा नीति यांच्या पायावर उभा राहिल्याशिवाय तो टिकूं शकणार

नाहीं. विज्ञानाचा पुरेपूर फायदा घ्यावयाचा हें कबूल! परंतु त्या विज्ञानाचा उपयोग कसा करावयाचा, त्याचा समाजांतील सर्व थरांतील व्यक्तींना कसा फायदा द्यावयाचा याचा विचार करण्यासाठीं आपणांस निश्चितपणें धर्माचा किंवा नीतितत्त्वांचाच आधार घ्यावा लागेल. डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे म्हणतात, "नीति व विज्ञान या दोन्ही गोष्टी समाजाला सारख्याच महत्त्वाच्या आहेत. विज्ञानानें सामर्थ्य निर्माण होतें व त्याचा मानवाला कल्याणप्रद उपयोग कसा करावा हें नीतिशास्त्र सांगतें. परंतु नीति काय व अनीति काय हें ठरविण्याला परिस्थितीचें जें ज्ञान लागतें तें विज्ञानावांचून अशक्य आहे. म्हणून या दोन्हींचें महत्त्व ज्या समाजांत सारखेंच मानलें जाईल व धर्म, नीति व आचार हे विज्ञानाच्या पायावर जेथें उभारले जातील तोच समाज समर्थ व सुखी होईल यांत शंका नाहीं, म्हणजे विज्ञानाचा उपयोग कसा करून घ्यावयाचा हें ठरविण्यासाठीं आजच्या युगांतहि आपणांस धर्माकडेच यावें लागेल आणि धर्माकडे जर आपण आलों नाहीं तर विज्ञान हें वरदान न ठरतां शापच ठरेल, आणि नेमकी हीच चूक आपण आजच्या जमान्यांत करीत आहोंत. आपण विज्ञानाचा उपयोग करतांना नीतीच्या तत्त्वावर करण्याचें विसरून गेलेलों आहोंत. त्यामुळें ज्या विज्ञानानें मानवाला सुखाचा मूलमंत्र दिला, तेंच विज्ञान मानवाला भस्मसात् करील कीं काय अशी साधार भीति आपणांस वाटूं लागलेली आहे. धर्माच्या व नीतीच्या तत्त्वावर विज्ञान आधारलेलें नसल्यानें अणू व परमाणू आपले दास झालेले असूनहि त्याचा उपयोग आपण संहारक अस्त्रें बनविण्यांत करीत आहोंत. एक लढाऊ विमान तयार करण्यास जेवढा खर्च येतो, तेवढ्या खर्चांत पांच लाख पोतीं गहूं तयार होईल! व एक विनाशिका तयार करण्यास जेवढा खर्च येतो तेवढ्याच खर्चांत ८००० माणसें सुखानें राहूं शकतील अशीं घरें आपण बांधूं शकूं! परंतु विज्ञानाचा फायदा अन्नधान्याचें उत्पादन वाढविण्यांत, किंवा घरें बांधण्यांत होत नाहीं, तर मानवाचा संहार करण्यासाठीं आपण त्याचा उपयोग करतों. सारांश, मानवानें मानव म्हणून एकमेकांशीं प्रेमानें वागावें, एकमेकांस प्रेमानें भेटावें, असें आपणांस अद्यापहि वाटत नाहीं. बाहेरून आपण कितीहि बदललेलों असलों तरी आपल्या मनाचें 'मॉडेल' मात्र

तेंच जुनें आहे. आपण पशूपक्षाप्रमाणें उडायला शिकलों, परंतु माणसासारखें पृथ्वीवर कसें नांदायचें हें मात्र अद्यापपावेतों शिकलों नाहीं. डॉ. राधाकृष्णन् 'The future of civilization' मध्यें म्हणतात त्याप्रमाणें संस्कृति व सुधारणा ही बाहेर नसून आपल्या अंतरंगांत आहे. तुमच्या नैतिक कल्पनांत, तुमच्या धार्मिक विचारांत, समाजांत पाहण्याच्या तुमच्या दृष्टिकोनांत संस्कृति भरलेली असते. आगबोटी आहेत, आगगाड्या आहेत, टंकलेखक आहेत व टेलिफोन आहेत, एवढ्यावरून आपण सुधारलों असें म्हणतां येणार नाहीं. माकड दुचाकीवर बसायला शिकलें, दारूचा पेला तोंडाला लावायला लागलें, चिरूट ऐटीनें ओढण्यांत तरबेज झालें तरी तें शेवटीं माकडच ! यांत्रिक सुधारणा म्हणजे कांहीं नैतिक सुधारणा नव्हे. बडा कारखाना चालवतां आला म्हणजे मनहि मोठें झालें असें नाहीं म्हणतां येणार !!! सारांश, विज्ञानाचें महत्त्व ओळखून, विज्ञानाचा फायदा व परमसुख मानावयाला कसें मिळेल हें ठरविण्यासाठीं धर्माकडेच मानवाला धांव घ्यावी लागेल. जर याप्रमाणें मानवानें केलें नाहीं तर मानवजातच नाहींशी होईल. म्हणून विज्ञानाचा उपयोग करतांना मनुष्याला 'मनुष्य' म्हणून समजून तो करून घ्यावा, 'यंत्र' म्हणून नव्हे, ही फार मोठी व महत्त्वाची बाब आपण लक्षांत घेतली पाहिजे. यंत्रसुधारणा वगैरे ज्या आहेत त्या मानवासाठीं आहेत. मनुष्य यंत्रासाठीं नाहीं ही महत्त्वाची बाब आपण लक्षांत घेणें आवश्यक आहे. थोडक्यांत आचार्य दादा धर्माधिकाऱ्यांनीं म्हटल्याप्रमाणें 'We want scientific religion and religious science' हें आपण लक्षांत ठेवलें पाहिजे. हाच मुद्दा अत्यंत उत्कृष्ट व यथायोग्य शब्दांत प्रा. द. के. केळकर यांनीं 'संस्कृति आणि विज्ञान' या पुस्तकांत मांडला आहे व म्हणून तो परिच्छेद लिहिण्याचा मोह मला टळत नाहीं. प्रा. केळकर म्हणतात, "......आपल्या राहणीच्या सांगाती, नव्हे पाठीशीं, निर्भीड विज्ञानपुष्ट सर्वोदयवादी विचारसरणी असेल तरच विज्ञान हें वरदान होईल याची आठवण जागती ठेवली पाहिजे. तसें न झालें तर जगाचा नाश अटळ आहे. विज्ञानवृद्धीनें विराट वैभव प्राप्त झालें आहे. पण त्याचें संगोपन

सर्वोदयवादी भावनेनें केलें पाहिजे. सद्भावनेला लाथाळून विज्ञानाला उराशीं धरूं तर विज्ञानाच्या स्फोटानें मानवजात भस्मसात् करूं. उलट विज्ञानाला लाथाळून भोळ्या भक्तिभावानें सर्वोदयाला कुरवाळूं तर दुष्काळाच्या खाईंत लोटले जाऊं......वर्धमान विज्ञान आणि वाढता सर्वोदय यांचा संगम साधता आला तरच नरजन्माला आल्याचें सार्थक झाल्याचा निःश्वास सोडतां येईल.'' आणि धर्म व नीति यांचें हेंच अटळ कार्य वैज्ञानिकयुगांत राहणार आहे.

धर्माचें दुसरेंहि एक फार महत्त्वाचें कार्य या युगांत राहील. मानवाचें नैतिक पुनर्घटन करणें फक्त धर्मालाच शक्य आहे. प्रत्येक कालांत जे जे महापुरुष होऊन गेले, ते आपापले आदर्श—धार्मिक व नैतिक आदर्श समाजापुढें आपल्या आचरणानें ठेवतात आणि त्यांच्या आदर्शामुळें समाजांतील व्यक्तींचेंहि नैतिक आचरण सुधारण्यास फार मोटी मदत होते. कोणताहि कायदा हें कार्य सुलभ रीतीनें करूं शकत नाहीं. विनोबाजी भावे यांनीं भूदान आंदोलनामुळें जें नैतिक व धार्मिक कार्य केलें तें कार्य कोणतेंहि शास्त्र करूं शकणार नाहीं आणि अशा तऱ्हेनें सामाजिक व नैतिक सुधारणा करण्याचें कार्य धर्मच करूं शकेल !

आतां एक शेवटचा मुद्दा असा निर्माण होतो कीं, या धर्माचें किंवा नीतीचें भौक्तिक अधिष्ठान काय ? आजचा बुद्धिवादी मनुष्य म्हणेल, 'नीतीनें वागलें म्हणजे पुण्य लागेल; मोक्ष मिळेल' इत्यादि गोष्टींवर आमचा विश्वास नाहीं. 'नीतीनें वागल्यावर प्रत्यक्ष व्यवहारांत फायदा काय हें सांगा' असा प्रश्न येणार ! व त्याचेंहि उत्तर देणें आवश्यक आहे व त्याचें उत्तर एकच कीं, समाजांतील सर्व व्यक्ती नीतीनें वागू लागल्या तर समाजांतील सर्व लोक सुखासमाधानानें वागूं शकतील. कोणावरहि आपत्ति येणार नाहीं. सर्व व्यक्ती सुखानें व समाधानानें राहूं शकतील. इंग्लंडमध्यें गेल्या २०० वर्षांत एकहि बँक गडगडली नाहीं. तेथील बँकेचे चालकांना पद्धतशीर रीतीनें बँकेंतील पैसे 'स्वाहा' करणें काय अशक्य आहे ? परंतु त्यांनींहि जबाबदारी ओळखली कीं, जर आपण पैसे खाऊन बँक संपुष्टांत आणली तर बँकेंत पैसे ठेवणाऱ्या हजारों लोकांचें जीवन दुःखमय होईल—कष्टमय

होईल, व समाजांतील कांहीं व्यक्तींचें जीवन दुःखमय होईल. म्हणजे बँक-मॅनेजर म्हणतो, "मला मिळालेल्या उत्पन्नावर जर मीं समाधान मानलें व नीतीनें वागलों, तर माझ्या बँकेंतील ठेव ठेवणारे लोकहि सुखांत राहतील." त्याचप्रमाणें धरणाची योजना पुरी पाडणारा इंजिनियर जर म्हणाला, "जनतेनें एक वेळ उपासमार सहन करून सरकारला कर दिलेला आहे व त्या पैशांतून सरकारनें मला धरणें बांधावयास सांगितलेलीं आहेत. तेव्हां अशा पैशाचा मीं जर अपहार केला तर लोकांच्या—जनतेच्या पैशाचाच अपहार होईल व जनतेला जास्त कराचे बोजे सहन करावे लागतील. अशा कांहीं व्यक्तींत माझे इष्टमित्र व नातेवाईकहि असतात. मला माझ्या गरजा भागविण्यापुरता भरपूर पगार सरकार देत आहे. म्हणून असें कार्य करणें इष्ट नव्हे." अशा आशयाची विचारसरणी—नैतिक विचारसरणी—जर त्यानें ठेवली तर समाजाची प्रगति होईल. सारांश, डॉक्टर, वकील, शेतकरी, मजूर, कारखानदार, व्यापारी, शिक्षक इत्यादि सर्व व्यक्तींनीं जर हें नीतीचें तत्त्व लक्षांत ठेवलें तर समाजांतील सर्व थरांच्या व्यक्तींना सुख लाभेल. आणि नीतीचा किंवा धर्माचा फायदा हें दाखविण्यासाठीं पुढील जन्म किंवा मोक्ष दाखविण्याची जरूरी नाहीं. तर याच जन्मीं काय फल मिळतें हें पटवितां येईल. आणि या दृष्टीनेंहि वैज्ञानिक युगांत धर्माचें कार्य अटळ आहे. विज्ञानानें कितीहि प्रगति केली तरी धर्माचें कार्य समाजांत कायमच राहील आणि ही बाब लक्षांत घेऊन आपण धर्माचें व नीतीचें पालन करण्याचा पवित्र निर्णय घेऊं या !!!

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १०८५८

## मध्यमवर्गीयांचा प्रश्न : ८

राष्ट्राची सर्व बाजूनें प्रगति होत चाललेली आहे. शेतकरीवर्ग, मजूरवर्ग इत्यादि वर्गांस वेगवेगळ्या प्रकारच्या सुखसोयी उपलब्ध करून देण्यासाठीं सरकारनें वेगवेगळ्या प्रकारचे कायदे पास करून, त्यांचा राहणीचा दर्जा सुधारण्याचा मनोमन प्रयत्न केलेला आहे, यांत तिळमात्र शंका नाहीं. परंतु दिवसानुदिवस तुटीच्या अर्थसंकल्पा [Deficit financing] मुळें म्हणा, किंवा इतर कांहीं कारणामुळें म्हणा महागाई सारखी वाढतच चालली आहे. असंख्य जीवनोपयोगी वस्तूंचे भाव चौपट पांचपट झालेले आहेत. अशावेळीं ज्या वर्गाचें उत्पन्न मात्र ठराविकच होतें व आहे, अशा मध्यमवर्गीयांची स्थिति अत्यंत अनुकंपनीय झालेली आहे. महागाईच्या मानानें उत्पन्नांत वाढ अगदींच नाममात्र झालेली आहे. ज्या वर्गाकडून समाज आणि राष्ट्र कांहीं विधायक कार्य अपेक्षितो त्या वर्गांतील पुष्कळ व्यक्तींना कांहीं वेळां उपासमारहि सहन करावी लागते. अशा प्रकारची परिस्थिति निर्माण झालेली आहे, शिवाय वेगवेगळ्या प्रकारच्या सरकारी कायद्यामुळें मध्यमवर्गीयांची परिस्थिति दिवसानुदिवस अधिकाधिक बिकटच होत चाललेली आहे. कुळकायद्यामुळें मध्यमवर्गीयच नव्हे तर गरीब पांढरपेशा वर्गहि अन्नाला मोताद झालेला आहे. सावकार नियंत्रण कायद्यामुळें, सावकारीचा धंदा करणाऱ्या वर्गाचे हातून तो व्यवसाय निघून गेल्यामुळें, त्यांचेपुढेंहि आतां पुढें काय करावें हा प्रश्न निर्माण झालेला आहे. व्यापारी क्षेत्रांत शक्यतों सहकारी पतपेढयांनाच प्रोत्साहन देण्याचा सरकारी धोरणामुळें, व्यापारी वर्गाचे हातांतील एक एक व्यापार कमी कमी होत चाललेला आहे. त्यामुळें त्यांच्यापुढेंहि काय करावें, याची समस्या आहेच. दारूबंदी केल्यामुळें ग्रामीण जीवनांतून अस्थिरता दिवसानुदिवस जास्त दिसू लागलेली

आहे. त्यामुळें ग्रामीण विभागांतील पांढरपेशा वर्ग शहराकडे धांव घेऊं लागलेला आहे. ग्रामीण विभागांत गुंडगिरी वाढल्यामुळें, पिढीजाद खेड्यांत राहणारा वर्ग आतां शहराकडे धांव घेऊं लागलेला आहे. शहरांतील वातावरणाची संवय नसल्यानें असल्या कैक कुटुंबांना शहरांत रहाणेंहि जमत नाहीं. शिवाय शहरांत येऊन काय व्यवसाय करावा हाहि प्रश्न अशा शेकडों कुटुंबांचे पुढें उभा राहिलेला आहे. एक प्रकारच्या संक्रमण अवस्थेंत आपला समाज व राष्ट्र असल्यानें, कांहीं वर्गापुढें अशा प्रकारच्या समस्या व प्रश्न निर्माण झालेले आहेत, म्हणून या प्रश्नांचें विवेचन या लेखांत करण्याचें योजलेलें आहे.

सर्वसाधारणरीत्या मध्यमवर्गीय मनुष्य समाजाच्या प्रगतीस फार मोठा हातभार लावतो, त्यामुळें या वर्गाकडे सरकारनें व सामाजिक कार्य करणाऱ्या संस्थांनीं संपूर्ण लक्ष देणें आवश्यक आहे. भारताच्या राजकीय चळवळीचें जर आपण सिंहावलोकन केलें तर आपणांस असेंच आढळून येईल कीं, राजकीय क्षेत्रांत प्रकर्षानें चमकणाऱ्या बहुसंख्य व्यक्ती मध्यमवर्गातील होत्या. मोठे लेखक, तत्त्वज्ञ, नट, गायक इत्यादि लोकहि मध्यमवर्गीयांतून निर्माण झालेले आहेत. सर्वसाधारणरीत्या मध्यमवर्गीय मनुष्य हा कलाप्रिय असतो. साहित्य, संगीत, राजकारण इत्यादि बाबींची त्याला हौस असते. प्रसंगाप्रमाणें व ज्या ज्या वेळीं जे विषय किंवा ज्या कलांचा अभ्यास करणें मध्यमवर्गीय माणसास शक्य असतें, अशा कलांचा किंवा विषयांचा अभ्यास मध्यमवर्गीय मनुष्य आवडीनें व हौसेनें करतो, व त्यामुळें त्याच्या ज्ञानाचा किंवा अनुभवाचा फायदा समाजाला किंवा राष्ट्राला मिळूं शकतो. फार श्रीमंत मनुष्य किंवा फार गरीब मनुष्य सहसा, साहित्य, कला किंवा राजकारणाच्या फंदांत पडत नाहीं. लो. टिळक, आगरकर, चिपळूणकर, शि. म. परांजपे, न. चिं. केळकर, यशवंतराव चव्हाण किंवा धनंजयराव गाडगीळ, सी. डी. देशमुख; अथवा गंधर्व, बालगंधर्व, इ. नट हे सर्व नामवंत लोक मध्यमवर्गातील होते व आहेत. त्यामुळें या वर्गास एक प्रकारचें विशिष्ट महत्त्व व प्राधान्य प्राप्त झालेलें आहे. म्हणून सर्व क्षेत्रांत भारताची प्रगति होण्याच्या दृष्टीनें या वर्गाचे जे हल्लीं हाल चाललेले आहेत. त्याकडे डोळेझांक करणें राष्ट्राच्या आणि समाजाच्या दृष्टीनें अहितकारक आहे. आणि या

दृष्टिकोनांतून पाहिल्यास या प्रश्नास फार महत्त्व प्राप्त झालेलें आहे. म्हणून मध्यमवर्गीयांची आर्थिक स्थिति सुधारण्याचा प्रयत्न करणें आवश्यक आहे.

मध्यमवर्गीयांची स्थिति सुधारण्याचे यत्न सरकारनें करावयास हवेत, आणि त्याचप्रमाणें खाजगी, सामाजिक संस्थांनींहि आणि मध्यमवर्गीयांनींहि या बाबतींत प्रयत्न करणें आवश्यक आहे, म्हणून आपण आतां क्रमशः विचार करूं.

प्रथमतः सरकारनें कोणत्या दृष्टीनें प्रयत्न करावयाचा याचा विचार करूं.

१. महर्गतेनें उच्चांक गांठला आहे, यांत तिळमात्र शंका नाहीं. जीवनोपयोगी वस्तूंच्या किंमती अत्यंत वाढलेल्या आहेत. धान्य, खाद्य तेलें, डाळी, दूध, भाजीपाला इ. वस्तूंच्या किंमती भरमसाठ वाढलेल्या आहेत. परंतु त्या मानानें महागाईभत्त्यांत मात्र वाढ झालेली नाहीं. किंमतींत जितकी वाढ झालेली आहे तितकीच वाढ महागाईंत करणें आवश्यक आहे, आणि या प्रश्नाचा बारकाईनें विचार करण्यासाठीं सरकारनें तज्ज्ञ माणसांची एक कमिटी नेमावी व महागाईच्या मानानें महागाईच्या भत्त्यांत वाढ झालेली आहे याची चौकशी करावी आणि महागाईंत जेवढी वाढ झाली तेवढीच वाढ करण्याचें सरकारी धोरण सरकारनें त्वरित अमलांत आणावें.

२. (अ) मध्यमवर्गीयांतील जे होतकरू विद्यार्थी असतील त्यांना शिक्षणासाठीं मदत देणें आवश्यक आहे. सरकारनें ९०० रुपयांचे आंत ज्यांचें वार्षिक उत्पन्न आहे, अशा पालकांच्या पाल्यास शैक्षणिक सवलती दिलेल्या आहेत ही गोष्ट फार समाधानाची आहे. परंतु रु. ९०० ची मर्यादा फारच कमी आहे. ही मर्यादा कमींत कमी रु. १८०० पावेतों करावयास हवी. तरच पुष्कळ मध्यमवर्गीयांना या योजनेचा फायदा मिळेल. व पुष्कळ होतकरू व हुषार मध्यमवर्गीय मुलांना शिक्षण घेऊन स्वतःच्या आयुष्याला इष्ट वळण लावतां येईल.

( ब ) शिवाय ज्या विद्यार्थ्यांना खूप मार्कस् मिळालेले नसतील त्यांनाहि शिक्षणाची सोय उपलब्ध व्हावी, किंवा ज्यांना शिक्षणासाठीं परदेशांत जाण्याची इच्छा असेल अशा विद्यार्थ्यांना सरकारनें शिष्यवृत्ति देणें जर अशक्य असेल तर कर्ज द्यावें, म्हणजे मध्यम प्रतीच्या विद्यार्थ्यांचीहि सोय होऊं शकेल. म्हणून या सूचनेचाहि सरकारनें अवश्य विचार करावा.

अनुक्रम २६२१ ग्रंथांक 1313 नों दि

(क) शिक्षणाव्यतिरिक्त इतर कलांना प्रोत्साहन देण्यासाठीं सरकारनें विविध प्रकारच्या कलांचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांनाहि शिष्यवृत्त्या द्याव्यात. उदा:—संगीत, साहित्य, चित्रकला इ. कलांचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांनाहि सरकारी मदत मिळणें आवश्यक आहे. जे विद्यार्थी शालेय शिक्षणक्रमांत चमकत नाहींत, परंतु ज्यांना कलेची आवड आहे, अशा विद्यार्थ्यांना त्यांच्या कलेस जर वाव मिळाला–शिक्षणास संधि मिळाली तर अशा प्रकारचे विद्यार्थी पुष्कळ क्षेत्रांत चमकूं शकतील असें वाटतें. म्हणून या सूचनेचा सरकारनें अवश्यमेव विचार करावा.

(३) ज्या कायद्यामुळें एखाद्या वर्गाचा व्यवसाय किंवा धंदा बंद होण्याचा संभव असतो, अशा प्रकारचे कायदे पास करण्याची जर जरूरी भासली, तर त्या कायद्यामुळें ज्या वर्गाच्या हातांतील धंदा किंवा व्यवसाय बंद होणार असेल अशा वर्गाची कांहीं तरी सोय केल्याखेरीज घाईघाईनें कायदे पास करणें इष्ट नव्हे. उदा. कुळकायदा. तत्त्वत: हा कायदा अंमलांत आणणें इष्ट आहे कीं नाहीं हा प्रश्न अलाहिदा. परंतु हा कायदा अंमलांत येण्याचे अगोदर सरकारनें या कायद्याचा प्रतिकूल परिणाम ज्या मध्यमवर्गीयांवर होणार आहे त्याची छाननी व विचार करावयास हवा होता, आणि अशा प्रकारचा परिणाम ज्या वर्गावर होण्याचा संभव आहे, अशा सर्व कुटुंबाची कांहींतरी व्यवस्था सरकारनें अगोदर लावावयास हवी होती. कूळकायद्यामुळें शेंकडो मध्यमवर्गीयांची फार शोचनीय परिस्थिति झालेली आहे. गरीब शाळामास्तर, पोस्टमास्तर, कारकून इ. प्रकारच्या मध्यमवर्गीयांनीं म्हातारपणीं उत्पन्नाचें कांहीं तरी साधन असावें म्हणून शेती घेऊन ठेवली. परंतु या कायद्याची कुऱ्हाड त्यांचे अंगावर कोसळल्यामुळें अशा शेंकडो कुटुंबांची वाताहात झाल्याचीं दृश्यें पुष्कळ गांवांतून पाहण्यास मिळतात. असा कायदा करण्याचे अगोदर सरकारनें अशा कुटुंबांची व्यवस्था करणें अवश्य होतें. अशा प्रकारची व्यवस्था केल्यानंतरच मग कूळकायद्याची जर अंमलबजावणी केली असती तर कदाचित् कूळकायदा इतका अप्रिय झाला नसता, शिवाय ज्या प्रकारचा व्यापार सरकारनें सहकारी पतपेढ्यांचे ताब्यांत दिला, किंवा ज्या धंद्याचें राष्ट्रीयकरण सरकारनें केलेलें आहे अशा धंद्यांत जे लोक होते त्यांच्या हातांत दुसरा व्यापार राहावा म्हणून सरकारनें अशा कुटुंबाची व्यवस्था कर-

ण्याची नैतिक जबाबदारी सांभाळण्याची फार आवश्यकता होती. मोटारीच्या धंद्याचें राष्ट्रीयकरण केलें त्यावेळीं या उद्योगधंद्यावर अवलंबून असणारीं शेकडों कुटुंबें होतीं. राष्ट्रीयकरण झाल्यामुळें अशा कुटुंबांची फार दुर्दशा झाली. राष्ट्रीयकरण करण्याचे अगोदर अशा कुटुंबांना अत्यल्प व्याजानें कांहीं भांडवल जर पुरविलें असतें, तर अशा प्रकारच्या कुटुंबांचे हाल पुष्कळ अंशानें कमी झाले असते. अशाप्रकारें ज्यावेळीं एखाद्या कायद्यामुळें एखादा वर्ग नामशेष होण्याचा संभव असतो, अशा वेळीं सरकारनें, अशा वर्गाचे हातीं उद्योगधंदा राहण्याची परिस्थिति निर्माण करावयास पाहिजे. अर्थात् कांहीं विशिष्ट प्रकारच्या उद्योगधंद्यांना भांडवल पुरविण्यासाठीं, कांहीं ठिकाणीं सरकारी यंत्रणा आहे. उदा. इंडस्ट्रिअल फायनान्स कॉर्पोरेशन. या संस्थेमार्फत कांहीं उद्योगधंद्यांना कर्ज वगैरे दिलें जातें. परंतु अशाप्रकारच्या सरकारी यंत्रणेंत दप्तर दिरंगाई फार दिसून येते. त्यामुळें सर्वसामान्य नागरिकांस त्या चाकोरींतून बाहेर येईपर्यंत 'त्राही भगवान्' होण्याची पाळी येते. अशा प्रकारच्या संस्थांतून व्यापारी तत्त्वावर कर्ज, त्वरेनें व जलदीनें मिळण्याची सरकारी यंत्रणा उभी करावयास हवी. आणि अशा प्रकारच्या संस्थेचें क्षेत्र अधिक व्यापक करावयास हवें. म्हणजे सर्वसामान्य नागरिकांस त्याचा फायदा मिळू शकेल. सारांश, ज्या मध्यमवर्गीय कुटुंबांवर सामाजिक किंवा आर्थिक क्रांति झाल्यामुळें दुर्दैवाची कुऱ्हाड कोसळलेली आहे अशा मध्यमवर्गीयांची पुनर्व्यवस्था करण्याची योजना सरकारनें हातीं घेणें आवश्यक आहे. याप्रमाणें सरकारनें उपाय केल्यास मध्यमवर्गीयांच्या प्रश्नास पुष्कळच चालना मिळून तो प्रश्न सुटण्यास पुष्कळच मदत होईल, यांत शंका नाहीं.

आतां वेगवेगळ्या सामाजिक संस्थांनीं व मध्यमवर्गीयांनीं या प्रश्नाकडे कोणत्या दृष्टीनें पहावें याचा विचार करूं. (१) मध्यमवर्गीयांची स्थिति अनुकंपनीय झाल्यानें, या वर्गातील कुटुंबांना जादा उत्पन्न मिळण्याचे दृष्टीनें या वर्गातील लोकांना संघटित रीतीनें ज्या कांहीं गोष्टी करतां येणें शक्य आहे, त्यांचा परामर्ष घेणें आवश्यक आहे. पुष्कळ गांवांतून स्त्रियांना फावल्या वेळांत काम करणें शक्य असतें, व त्यामुळें कुटुंबांना मदत करतां येते. एखाद्या पेठेंतील किंवा गांवांतील मध्यमवर्गीय स्त्रियांनीं जर एखादी

सहकारी सोसायटी काढली व त्या पतपेढीतर्फे लोणचीं, मसाला पापड इ. वस्तू विक्री करण्याची योजना जर ठरविली तर पुष्कळ मध्यमवर्गीयांचे उत्पन्नांत कांहीं अंशानें का होईना पण भर पडूं शकेल. (२) या व्यतिरिक्त पुष्कळ महिलांना शिवणकाम वगैरे करूनहि आपल्या उत्पन्नांत भर टाकतां येईल. आणि ज्या महिलांना गायन वगैरे शिकण्याची कला अवगत आहे, अशा महिलांना गायनाचे वर्ग काढूनहि आपल्या उत्पन्नांत भर टाकतां येईल. (३) ज्या पुरुषांना टंकलेखन करतां येतें त्यांना फावल्या वेळांत टंकलेखन, शिकवण्या इ. द्वारा स्वतःचें उत्पन्न वाढवितां येईल. (४) या व्यतिरिक्त शेंकडो घरगुती उद्योगधंदे लक्षांत घेऊन उत्पन्न वाढविण्याचा प्रयत्न मध्यमवर्गीयांना करतां येईल. उदा. स्नो, पावडर वगैरे तयार करणें, दंतमंजन तयार करणें इ. अर्थात् अशा प्रकारच्या तयार केलेल्या वस्तूंची विक्री पद्धतशीर व्हावी, म्हणून त्याप्रीत्यर्थ आपल्या सामाजिक संस्थांनीं पुढाकार घेऊन विक्रीसाठीं सहकारी सोसायट्या काढणें आवश्यक आहे. अर्थात् अशा प्रकारच्या सहकारी सोसायटीज् कांहीं शहरांत आहेतच, परंतु अशाप्रकारच्या पुष्कळ सोसायटीज् काढण्यास व चालविण्यास अद्याप भरपूर वाव आहे. म्हणून आपल्या सामाजिक संस्थांनीं समाजकार्य करण्याचें योग्य व नवीन क्षेत्र लक्षांत घेऊन या बाबतींत आपण योग्य तीं पाऊलें टाकावींत.

त्याचप्रमाणें हा प्रश्न सोडविण्याचे दृष्टीनें मध्यमवर्गीयांनीं स्वतःच्या दृष्टिकोनांतहि आमूलाग्र बदल करणें अवश्य आहे. कांहीं वेळां राष्ट्राच्या आणि समाजाच्या इतिहासांत वेगवेगळ्या प्रकारची क्रांति होते, त्यावेळीं संक्रमण काळांत कांहीं वर्गाच्या परिस्थितींत प्रतिकूल परिणाम होण्याचा संभव असतो, हें लक्षांत घेऊन व बदलल्या काळाचीं पाऊलें लक्षांत घेऊन, आपली राहणी, आपल्या संवयी, आपले उत्सव इ. बाबींत आपण यथायोग्य फरक करावयास हवा. असा फरक जर बदलत्या कालमानाप्रमाणें केला नाहीं तर मग मात्र फार कठीण प्रश्न निर्माण होतात. ‘आमचे वाडवडील जमीनदार होते, सावकार होते आतां मी हें काम कसें करूं, तें काम कसें करूं, नोकरी कशी करूं किंवा खोल्यांच्या ब्लॉकमध्यें माझा संसार कसा थाटूं’ इत्यादि प्रकारचीं मतें किंवा दुरभिमान सोडण्यास मध्यम-

वर्गीयांनीं शिकलें पाहिजे. अद्यापहि लग्न, मुंज इ. उत्सवांत मध्यमवर्गीय मनुष्य कर्ज काढून हजारों रुपये खर्च करतो. 'अमका समारंभ केलाच पाहिजे, अमकें जेवण केलेंच पाहिजे, असें नाहीं केलें तर वाईट दिसेल, तें शोभून दिसणार नाहीं, पूर्वींच्या पद्धतीस अनुसरून दिसणार नाहीं, कसेंहि करून तें केलेंच पाहिजे.' या भावनेनें अद्यापहि लग्नांत किंवा इतर उत्सवांत कांहीं मध्यमवर्गीय कुटुंबें 'ऋण काढून सण साजरा करतात! आणि त्यामुळें अशाप्रकारच्या मध्यमवर्गीय कुटुंबाची आर्थिक स्थिति वर्षानुवर्षें कठीणच राहते. सामाजिक किंवा राष्ट्रीय क्रांती झाल्यामुळें आतां आपला काळ बदलला आहे. आपण आपल्या जुन्या पद्धती व संवयी बदलणें आवश्यक आहे, याची जाणीव ठेवणें जरूर आहे. आणि परिस्थितीनुरूप बदलत्या कालांत आपणांस स्थैर्य लाभण्याच्या दृष्टीनें मध्यमवर्गीय कुटुंबानें, सर्वतोपरी प्रयत्न, स्वतःच्या कुटुंबाचा कांहीं प्रसंगीं पूर्व इतिहास लक्षांत न घेतां, केला पाहिजे. आपल्या माजी संस्थानाच्या अधिपतींनीं 'आम्ही अद्यापहि राजे आहोंत, आम्हांस आमच्या प्रजेनें पूर्वींप्रमाणें मान द्यावयास पाहिजे' अशा प्रकारची दृष्टि जर ठेवली तर, त्याचा कांहीं उपयोग होईल काय? मुळींच नाहीं! उलट अशा प्रवृत्तीनें समाजांत वावरल्यास मनःस्ताप मात्र भरपूर होईल. कारण लोक बिलकूल मान देत नाहींत, परंतु मान घेण्याची इच्छा मात्र फार आहे. अशाप्रकारचा मानसिक कोंडमारा बिचाऱ्या माजी संस्थानिकांस सहन करावा लागेल. त्याचप्रमाणें छोटया जमीनदारांचें व सावकारांचें आहे. बदलत्या काळाचीं पाऊलें व प्रवाह लक्षांत घेऊन त्याप्रमाणेंच वागण्याचा मनोमन प्रयत्न मध्यमवर्गीयांनीं करणें आवश्यक आहे. त्याकरितां स्वतःच्या मनाची वैचारिक बैठकसुद्धां बदलणें आवश्यक आहे. आणि या नवीन निर्माण झालेल्या परिस्थितींत मध्यमवर्गीयांनीं स्वतःच्या कुवतीप्रमाणें व शक्तीप्रमाणें नवीन व्यवसाय शोधले पाहिजेत तरच हा प्रश्न सुटण्यास मदत होईल.

याप्रमाणें सरकार, सार्वजनिक संस्था व मध्यमवर्गीय व्यक्ती या सर्वांनीं हा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करावा.

# लोकप्रिय कसें व्हावें ? : ९

दैनंदिन व्यवहारांत अत्यंत हुषार, पदवीधर असलेले तरुण अयशस्वी झालेले दिसतात. तर सहीसुद्धां करतां न येणारे आंगठेबहाद्दर लक्षाधीश झालेले आढळतात. अशा वेळीं सर्वसामान्य मनुष्य म्हणतो, " अरे हा एम्. ए. झाला आणि याची प्रगति कांहींच नाहीं असें कां ?" पण फार तर दैवावर हवाला टाकून स्वस्थ बसण्याची प्रवृत्ति आपणांकडे दिसून येते. परंतु अत्यंत शिकलेल्या माणसाचें अपयश आणि अशिक्षित माणसाचें यश, हें ज्याच्या त्याच्या व्यवहारकुशलतेवर अवलंबून असतें. व्यवहारांत यश मिळण्यासाठीं, पदवीचा उपयोग होत नाहीं तर व्यवहारांत वागण्याची प्रत्येक माणसाची जी पद्धति आहे त्या पद्धतीमुळेंच मनुष्याला यश किंवा अपयश मिळूं शकेल. म्हणून सर्वसामान्य मनुष्याला यश मिळण्यासाठीं व लोकप्रियता संपादन करण्यासाठीं कसें वागावें याचें विवेचन करण्याचें या लेखांत योजलेलें आहे.

व्यवहारांत लोकप्रिय होण्यासाठीं पहिला व महत्त्वाचा गुण म्हणजे शालीनता. शालीनतेनें तुम्ही बहुसंख्य मानवांचीं मनें काबीज करूं शकाल. शालीनतेनें वागणारा मनुष्य व्यवहारांत यशस्वी होतो. तो कोठेंहि गेला म्हणजे समोरच्या माणसाचें अंतःकरण काबीज करूं शकतो. अनोळखी ठिकाणीं जर हा मनुष्य गेला, तर प्रथमतः तो समोरच्या माणसावर आपल्या व्यक्तिमत्त्वाची छाप पाडूं शकतो. आणि त्यामुळें समोरच्या माणसाच्या मनांत स्वतःबद्दल सहानुभूति निर्माण करूं शकतो. म्हणून दैनंदिन व्यवहारांत वागतांना एकमेकांशीं विनयानें बोलणें, प्रेमाणें बोलणें याला फार महत्त्व आहे. संत तुकाराम म्हणतात, " महापूरे झाडें जाती तेथें लोहाळे राहती. " व्यापारी

त्याच्या ग्राहकाबरोबर, किंवा ग्राहक व्यापाऱ्याबरोबर, वकील पक्षकाराबरोबर, डॉक्टर पेशंटबरोबर, ऑफिसर त्याच्या मदतनीसाबरोबर इत्यादि सर्व ठिकाणीं सर्व प्रकारचे लोक जर शालीनतेनें वागले तर हल्लीं प्रत्येक क्षेत्रांत जेवढें काम होतें त्याच्या दीडपट काम निश्चित होईल आणि जास्त यशस्वी होईल. एका ऑफिसरनें त्याच्या हाताखालील नोकराकडून कशा पद्धतीनें, शालीनतेनें कार्य करून घेतलें याची एक सत्यकथा मी अनुभवलेली आहे. ती येथें मुद्दाम नमूद करतों.

एका ऑफिसमध्यें खूप काम तुंबून राहिलेलें होतें. आणि एका नवीन ऑफिसरची तेथें नेमणूक झाली. त्यानें पाहिलें कीं, येथील नोकरवर्ग हा कांहीं केल्या दाद देत नाहीं व त्यामुळें तेथील सर्व कामें तुंबून पडतात. ऑफिसमध्यें आल्यावर त्यानें २–३ दिवस कामाचें स्वरूप पाहिलें व एकदां मदसनीस त्याचे घरीं गेल्यावर त्याचे बाजूला एके ठिकाणीं फोन केला. व ऑफिसर म्हणाला, " मिस्टर ××× तुम्ही काय करतां ? मी आतां ऑफिसमध्यें आलेलों आहें, व माझा वेळ जात नाहीं. तेव्हां तुम्ही गप्पा मारण्याकरितां माझेकडे याल तर बरें होईल—" सदरच्या कारकुनाची अर्थात्च ऑफिसमध्यें जाण्याची इच्छा नव्हती. परंतु तो अशाप्रकारच्या 'विनवणीस' नाहीं कसें म्हणणार ? म्हणून नाइलाजास्तव त्या कारकुनाला 'मी येतों' असें फोनवर म्हणावें लागलें. याप्रमाणें तो ऑफिसमध्यें आला व प्रथमचीं ५ मिनिटें अक्षरशः ऑफिसर काम करीत होता व कारकून बसून होता. त्याची त्यालाच लाज वाटली व काम करण्यास सुरुवात केली. याप्रमाणें त्यानें त्याचेकडून दररोज काम करून घेण्यास सुरुवात केली व कांहींहि त्रास न होतां त्या ऑफिसचें काम सुरळीत चाललें ! वडील माणसें बाहेरून हातांत पिशवी घेऊन येतात. त्यावेळीं चटकन् त्यांच्या हातांतील पिशवी घेणें, ते आलेले असतांना त्यांचेसमोर लोडाला टेकून न बसणें, एखाद्या अधिकाऱ्याकडे भेटीसाठीं गेल्यानंतर त्याचे टेबलावरील वस्तूबरोबर उगीचच चाळे न करणें इत्यादि गोष्टी अगदीं सूक्ष्म व किरकोळ जरी वाटत असल्या तरीहि त्याला दैनंदिन जीवनांत फार मोठें स्थान आहे. अशा या किरकोळ बाबतींतसुद्धां शालीनतेनें वागून, आपणांस आपली लोकप्रियता वाढवितां येते. मनुष्य सत्तेनें, धनानें, ज्ञानानें व कीर्तीनें कितीहि

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थ
२८२९६ वि:
अनुक्रमांक ९३१३ नोंद दि.

मोठा झाला, परंतु तो जर व्यवहारांत उर्मटपणानें वागूं लागला तर तो अगदीं अप्रिय होतो, असा दैनंदिन अनुभव आहे. आणि याच्या विरुद्ध असा मोठा मनुष्य जर सौजन्यपूर्ण वागला तर इतर लोक म्हणतात, " एवढा मोठा मनुष्य-पण वागणें काय अदबी, बोलणें कितीतरी लाघवी-खरोखर सुंदर मनुष्य आहे हा—" अशा प्रकारची लोकप्रियता तो मनुष्य मिळवूं शकतो. 'विद्या विनयेन शोभते' ही म्हण अगदीं सार्थ आहे. आपल्या राज्याचे लोकप्रिय मुख्य मंत्री नामदार यशवंतराव चव्हाण यांचेबद्दल त्यांचे विरोधकसुद्धां चांगले उद्‌गार काढतात त्याचें कारण एकच—त्यांची विनयशील वृत्ति ! सारांस, सौजन्यपूर्वक वागणें ही व्यवहारांतील यशाची गुरुकिल्ली होय, असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं.

व्यवहारांत यशस्वी होण्यासाठीं दुसरा महत्त्वाचा गुण म्हणजे तुम्ही ज्या व्यक्तीकडे तुमच्या कामासाठीं जातां त्या व्यक्तीच्या अडचणी व भावना लक्षांत घेऊन तुमचें संभाषण तुम्ही सुरू करण्याचें तंत्र लक्षांत घ्यावयास पाहिजे. याचीं तुम्हांला दैनंदिन जीवनांतील किरकोळ उदाहरणें देतों. आपण कांहीं किराणामाल आणण्यासाठीं दुकानांत जातों. तेथें ५।६ गिऱ्हाइकें थांबलेलीं असतात व मालक प्रत्येक ग्राहकास पाळीपाळीनें माल देत असतो. अशावेळीं तीं सर्व गिऱ्हाइकें बसलेलीं असूनहि तुम्ही मध्येंच तोंड खुपसून 'मला जरा पावशेर गूळ द्या हो,' असें म्हणालांत तर दुकानदाराच्या मनावरील पहिली प्रतिक्रिया अशी होणार 'अरे गृहस्था हो—हो-तुझ्या अगोदर येथें ५-६ लोक थांबलेले आहेत. आणि तूं आत्तांच येथें आलेला आहेस तर लगेच एवढी गडबड कशाची ?' असें म्हणून प्रथमतः त्याला गडबड करणाऱ्या गिऱ्हाइकाविषयीं तिरस्काराची भावना त्याच्या मनांत निर्माण होईल व तो निश्चितपणें थोडासा हलक्या प्रतीचा गूळ तुमच्या गळयांत मारील ! तीच गोष्ट आपण ऑफिसमध्यें गेल्यानंतरची ! एका ऑफिसरच्या पुढें, किंवा डॉक्टर किंवा वकिलाकडे ५-६ लोक तिष्ठत बसलेले असतांना, आपण त्यांचेकडे जावयाचें, व ते बोलत असतांनाच आपण मध्येंच तोंड खुपसून त्यांचेशीं उभें राहून बोलावयाचें व परत निघून जावयाचें हा सर्वांत वाईट प्रकारचा शिष्टाचार आहे. कारण आपल्या अशा प्रकारच्या वागण्यानें आपण समोरच्या व्यक्तींत आपणाविषयीं अत्यंत वाईट मत निर्माण करून देतों, याची

आपणांस जाणीवहि नसते. समोरचा मनुष्य म्हणतो, "सद्गृहस्था, तुला घाई आहे तशी घाई मलापण आहे—पण तुझी ही वागण्याची पद्धति कोठली? माझेसमोर इतके लोक बसलेले असतांना, मी त्यांचेबरोबर बोलत असतांना, तूं सर्वांना डावलून तुझेंच घोडें मध्यें दामटतोस हा न्याय कोठला?" अशा या वागण्यानें समोरच्या व्यक्तीच्या अंगीं आपण अप्रियता निर्माण करतो. आपणांला जसें काम आहे तसें इतरांनाहि असतें. व आपणांला वेळेचें महत्त्व आहे तसें इतरांनाहि महत्त्व असतें. हें लक्षांत घेऊन, ज्या माणसाकडे आपण कामाच्या निमित्तानें गेलों, त्याच्या भावनांना, त्याच्या वेळेला जर आपण यथायोग्य आदर व मान दिला तर आपण आपली लोकप्रियता निश्चितपणें वाढवितों. नाहींतर आपली अप्रियता वाढविण्यास आपणच कारणीभूत होतों. पुष्कळ व्यक्तींचे अंगीं असा साधा शिष्टाचार नसल्यानें पुष्कळशा व्यक्ती व्यवहारांत पदोपदीं अप्रियता निर्माण करतात. उलट समोरच्या व्यक्तीवर आपली छाप पाडण्याच्या दृष्टीनें पुष्कळ लोक त्यांचेकडे गेल्यावर 'तुमचें सावकाश होऊं द्या हो—मी थांबतों थोडा वेळ —' असें म्हणतात व समोरच्या माणसाचे अंतःकरणांत एक प्रकारचा ओलावा निर्माण करतात. याचें कारण एकच कीं, अशीं व्यवहारचतुर माणसें, इतरांच्या भावना व इतर व्यक्तींचा वेळ यांना यथायोग्य मान देतात व त्यामुळेंच त्या व्यक्तीविषयीं आदर निर्माण होतो, आणि त्यामुळें अशा व्यक्तीची लोकप्रियता वाढूं शकते. सारांश, इतरांच्या भावनांना व वेळेस, महत्त्व देण्याची कला शिकणें हा दुसरा महत्त्वाचा मुद्दा होय.

व्यवहारांत यशस्वी होण्यासाठीं तिसरा महत्त्वाचा गुण म्हणजे 'ऐकून घेण्याची कला' अंगीं असण्यासंबंधींचा होय.

समोर आलेल्या व्यक्तींचीं सुखें किंवा दुःखें, यश किंवा अपयश शांतपणानें जो मनुष्य ऐकून घेतो, तो मनुष्य व्यवहारांत जास्त लोकप्रिय होतो. माणसाचा स्वभावच असा आहे कीं त्याला स्वतःला सुखाच्या किंवा दुःखाच्या, यशाच्या किंवा अपयशाच्या ज्या कांहीं संवेदना होतात किंवा जे कांहीं असे बरे-वाईट प्रसंग येतात ते प्रसंग त्याला सर्वांना सांगावेसे वाटतात.

चांगला प्रसंग असला तर सर्वांनीं कौतुक करावें असें वाटतें, वाईट प्रसंग असला तर इतरांनीं सहानुभूति व्यक्त करावी असें वाटतें.-दुःखाचा प्रसंग असला तर इतर व्यक्तींनीं आपलें दुःख ऐकून घेऊन आपणांबरोबर चार प्रेमाचे व सहानुभूतीचे शब्द बोलावे असें वाटत असतें व जो मनुष्य अशा तऱ्हेनें इतर व्यक्तींचीं सुखें किंवा दुःखें, यशाचे प्रसंग किंवा अपयशाचे प्रसंग सहानुभूतिपूर्वक ऐकून घेतो असा मनुष्य व्यवहारांत फार लोकप्रिय होतो. म्हणून ज्या माणसाला व्यवहारांत लोकप्रिय व्हावयाचें आहे अशा माणसानें, इतर माणसांचें मनोगत ऐकून घेण्याची कला आत्मसात् करणें आवश्यक आहे. इतकेंच काय पण एखाद्या व्यक्तीची आपणांस जर अडचण ठाऊक असली तर अशा व्यक्तीला जर आपण आठवणीनें विचारलें, " कां हो रामभाऊ, तुम्ही मागें भेटलां होतां त्यावेळीं तुम्ही मला त्या सोनोपंतानें तुमच्यावर खोटा दावा लावल्याचें सांगितलेलें होतें. त्याचें पुढें काय झालें हो ?" असें जर तुम्ही आठवणीनें विचारलें तर समोरच्या माणसांचें अंतःकरण तुम्ही काबीज केलेंच म्हणून समजा ! सारांश, इतर व्यक्तींचीं सुखें, किंवा दुःखें जर ऐकून घेण्याची कला तुम्ही आत्मसात् केलीत तर तुम्हांला तुमची लोकप्रियता निश्चितपणें वाढवितां येईल !

व्यवहारांत लोकप्रिय होण्यास आणखीहि एका गुणाची आवश्यकता आहे. त्याचें विवेचन करूं. आपण एखाद्या व्यक्तीकडे गेल्यानंतर कांहीं निमित्तानें एखाद्या विषयावर चर्चा चालू असते. दुर्दैवानें त्याबाबत आपलीं मतें अगदीं वेगळीं असतात. त्यामुळें आपण साहजिकपणेंच तेथें चर्चा सुरूं करतो. त्यांत कांहीं फारसें वावगें होत नाहीं. परंतु वादविवाद करतांना, चर्चेच्या भरांत आपण प्रतिपक्षावर इतके तुटून पडतों कीं, समोरच्या व्यक्तीच्या भावनेला आपण जबरदस्त धक्का दिलेला आहे, हें आपल्या लक्षांतहि राहत नाहीं. आणि आपलें बोलणें जर राणा भीमदेवी थाटाचें अतिक्रमण करणारें असलें तर समोरच्या व्यक्तीच्या, हृदयांतील आपण सहानुभूति गमावून बसतों. आपलें जर समोरच्या व्यक्तीकडे काम असेल, तर चर्चेच्या वेळीं 'अहो, जाऊं द्या हो; आपल्याला त्या चर्चेशीं काय करायचें आहे' अशा आशयाचीं उत्तरें देऊन, ती चर्चा टाळणें हेंच उत्तम. अथवा चर्चा जर टाळतां आली नाहीं तर आपली भाषा, आपण अशा प्रकारची ठेवावी

ग्रं. क्र. १०६६८

कीं समोरच्या व्यक्तीस आपली भाषा अपमानास्पद वाटणार नाहीं. अशा-प्रकारें जर आपण वागलों तर आपली लोकप्रियता निश्चितपणें वाढते.

यानंतरचा आणखीहि एक गुण आपणांस व्यवहारांत पदोपदीं लागतो. त्याचेंहि विवेचन करणें आवश्यक आहे. ज्या व्यक्तीकडे आपण कांहीं कामाच्या निमित्तानें गेलों, त्या व्यक्तीकडे पाहून प्रसंगावधान राखून जर आपणांस सहानुभूति निर्माण करतां आली तर आपणांस आपली लोक-प्रियता निश्चितपणें वाढवितां येते. उदा. 'अ' हा 'ब' ह्या ऑफिसरकडे त्याच्या कांहीं कामानिमित्त गेलेला आहे व 'ब' हा काम करतांना ३–४ वेळां सर्दी झाल्यामुळें खोकला. अशा वेळीं प्रसंगावधान राखून 'काय साहेब, सर्दी फार झालेली आहे वाटतें—निलगिरी कां घेत नाहीं बरें?" असें जर आपण म्हणालों तर आपण आपल्याविषयीं समोरच्या अधिका-ऱ्याच्या मनांत निश्चितपणें सहानुभूति निर्माण करतों हें लक्षांत ठेवावें. किंवा ऐन उन्हाळ्याचे दिवसांत आपण एखाद्या डॉक्टरच्या घरीं गेलों व डॉक्टरसाहेब घामानें डबडबल्या स्थितींत आपणांस आढळले तर आपण चटकन "यंदां उन्हाळा भयंकर आहे बुवा! असें म्हणावयास हवें असें बोलण्यानें आपण प्रथमतःच त्याच्या दुःखाशीं किंवा अडचणींशीं समरस झालेले आहोंत, असें त्यास वाटतें व त्यामुळें त्याला आपणांविषयीं सहानुभूति वाटते. म्हणून प्रसंगावधान राखून आपण समोरच्या व्यक्ती-बरोबर जर वागूं लागलों तर आपली लोकप्रियता निश्चितपणें वाढेल.

या व्यतिरिक्त ठरल्यावेळीं लोकांचेकडे जाणें, जर आपण जाऊं शकलों नाहीं तर हस्ते परहस्तें अथवा पत्रानें दिलगिरी प्रदर्शित करणें, नवीन वर्ष सुरू झाल्यावर किंवा एखाद्या कार्यांत यश मिळाल्याबरोबर त्याचें यथायोग्य शब्दांत अभिनंदन इत्यादि बाबीमुळेंहि लोकप्रियतेंत भर पडते. सारांश, दैनंदिन व्यवहारांत आपण वरील सर्व मुद्यांचा विचार करून लोकप्रिय होण्याचा प्रयत्न करावा व आपलें व्यावहारिक जीवन यशस्वी करण्याचा प्रयत्न करावा.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
२८२९६ विः

REFBK-0010879